सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. ७ मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक २३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## चार दिवस बँका बंद

**मुंबई :** SBI च्या ग्राहकांसाठी महत्त्वाची माहिती आहे. स्टेट बँक ऑफ इंडियानं त्यांच्या ग्राहकांना महत्त्वाची सूचना दिली आहे. बँकिंग संदर्भातील काही काम असेल तर त्यांच्यासाठी ही महत्त्वाची अपडेट आहे. बँकेचं कामकाज दि. २३ ते २६ मे दरम्यान जवळपास चार दिवस ठप्प राहण्याची शक्यता आहे. बँकेचे कर्मचारी संपावर जाणार आहेत. SBI कर्मचारी संघटनांनी दोन दिवसांच्या संपाची घोषणा केली आहे. त्यामुळे दोन दिवसांचा संप आणि दोन दिवसांच्या सुट्ट्या, अशाप्रकारे सलग चार दिवस बँका बंद राहणार आहेत. त्यामुळेच, ग्राहकांनी बँकेशी संबंधित कामे तात्काळ करून घेणे आवश्यक आहे.

## विनेश फोगाटला नोटीस

**नवी दिल्ली :** भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाटला उत्तेजक चाचणी देण्यासाठी गैरहजर राहिल्याप्रकरणी इंटरनॅशन टेस्टिंग एजन्सी (आंतरराष्ट्रीय चाचणी एजन्सी) अर्थात आयटीएकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटीसला सात दिवसांत उत्तर देणे विनेशसाठी बंधनकारक आहे. विनेशने वर्षभरात केलेली ही पहिली चूक आहे. नियमांनुसार आंतरराष्ट्रीय कुस्तीपटूंना नियमितपणे आयटीएची उत्तेजक चाचणी द्यावी लागते. या चाचणीला कोणतेही कारण न देता गैरहजर राहिल्यामुळे आयटीएने विनेश फोगाटला नोटीस बजावली आहे. नियमानुसार वर्षभरात तीन वेळा चाचणीला गैरहजर राहिल्यास संबंधित खेळाडूवर दोन वर्षांची बंदी लागू शकते.

## आर्यनसिंहचा विक्रम

**मुंबई :** कामाचा माणूस' म्हणून प्रसिद्ध असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते आदरणीय अजितदादा पवार यांना समर्पित म्हणून आर्यनसिंह दडियाला या युवकाने २१० किलोमीटरचा महाराष्ट्र सीमेजवळील क्रेरीम बीच ते कर्नाटक सीमेजवळील पोलेम बीच असा खुल्या समुद्रातील दोन-मार्गी (टू-वे) एकल (सोलो) मॅरेथॉन पोहण्याचा ऐतिहासिक विक्रम केला आहे. दरम्यान यासंदर्भात आज आर्यनने राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांची देवगिरी येथे भेट घेतली. ४९ तास ४१ मिनिटे ०४ सेकंद असा २८ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ यादरम्यान अखंड पोहण्याचा पराक्रम आर्यनसिंह दडियाला याने केला.

## न्यायालय उडवून देण्याची धमकी

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील शिमला येथील तीन शाळांना धमक्या मिळाल्यानंतर आता आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रोहडू भागातील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय आणि न्यायालय उडवण्याची धमकी देणारे पोस्टर बुधवारी सकाळी भराड़ी रस्त्यावर आढळल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर रोहडूमध्येही मोठी खळबळ उडाली असून प्रशासनाने तातडीने सुरक्षेचे कडक उपाय सुरू केले आहेत.

## पश्चिम बंगालमध्ये तोडफोड

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी हिंसाचार आणि तोडफोडीच्या घटना घडत असल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे. या पार्श्वभूमीवर आता भारत निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेत संबंधित यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हिंसाचारात सहभागी असलेल्या कोणालाही सोडले जाणार नाही आणि दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल

# वंदे मातरम'ला राष्ट्रगीत 'जन गण मन'च्या समान दर्जा देण्याचा प्रस्ताव मंजूर

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील प्रचंड विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय कॅबिनेटच्या पहिल्याच बैठकीत ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीत 'जन गण मन'च्या समान दर्जा देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. बैठकीला उपस्थित असलेल्या मंत्र्यांनी बंगालमधील ऐतिहासिक विजयाबद्दल पंतप्रधान मोदी यांचं अभिनंदन केलं. मोदी सरकारनं 'राष्ट्रीय गौरव अपमान निवारण अधिनियमा'त दुरुस्तीचा प्रस्ताव स्वीकारला आहे. ही दुरुस्ती लागू झाल्यावर बंकिमचंद्र चॅटर्जी लिखित 'वंदे मातरम्'साठी आता राष्ट्रगीतासाठी लागू असलेले नियम लागू होतील. याचं उल्लंघन गंभीर गुन्हा मानण्यात येईल.सध्याच्या कायद्यानुसार राष्ट्रीय ध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताचा अपमान केल्यास तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. प्रस्तावित बदलांनंतर 'वंदे मातरम्'लादेखील हेच नियम लागू होतील. या गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.सध्याच्या कायद्यांनुसार, एखाद्या व्यक्तीनं राष्ट्रगीताचं गायन सुरु असताना त्यात जाणूनबुजून अडथळा आणल्यास त्या व्यक्तीला तीन वर्षांपर्यंतचा कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. आता राष्ट्रीय गीतलादेखील याच कायद्याच्या चौकटीत आणण्यात आलं आहे. याआधी २००५ मध्ये कायद्यात दुरुस्ती करण्यात आली होती. तिरंग्याचा अपमानास्पद वापर रोखण्यासाठी ही दुरुस्ती करण्यात आली. वंदे मातरम ला राष्ट्रगीताच्या बरोबरीचा दर्जा देण्याच्या मागणीनं गेल्या वर्षी जोर धरला होता. 'वंदे मातरम'ला गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानं संसदेत एका विशेष चर्चेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यात सर्वपक्षीय खासदारांनी सहभाग घेतला होता. यानंतर चार महिन्यांनी मोदी सरकारनं 'वंदे मातरम'ला राष्ट्रीय गीताच्या बरोबरीचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे.




## भाजपच्या पहिल्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी शनिवारी

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील ऐतिहासिक विजयानंतर या राज्यात नवीन सरकार स्थापनेला गती देताना भारतीय जनत पक्षाच्या बंगाल विजयाची रणनीती आखणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची त्या राज्यातील केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्याचे मंगळवारी जाहीर करण्यात आले. बंगालमधील भाजपच्या पहिल्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा शनिवारी (नऊ मे) होणार असल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य यांनी कोलकाता येथे सांगितले. दरम्यान,बंगालमधीलभाजपच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदासाठी सध्याचे विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा असली, तरी स्वपन दासगुप्ता, अग्निमित्रा पॉल, कालियागंजचे स्वामी ज्योतिर्मयानंद, निखिल बॅनर्जी आदींची नावे आघाडीवर आहेत. मात्र, दिल्लीतील पक्षनेते त्याबद्दल मौन बाळगून आहेत. भाजपने विजयाची हॅटट्रिक केलेल्या आसाममधील विधिमंडळ पक्षनेत्याच्या निवडणुकीसाठी भाजपने माजी पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून व हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांची सहनिरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. बंगालमध्ये शहा यांच्या जोडीला ओडिशाचे मुख्यमंत्री मोहनचरण मांझी हे सहनिरीक्षक असतील. अवघ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पश्रि्चम बंगालमध्ये भाजपने अक्षरश: इतिहास घडवला.

# अमेरिका-इराण युद्ध समाप्तीच्या समीप..!

### पुढील ४८ तास ठरणार निर्णायक

**वृत्तसंस्था**

**वॉशिंग्टन :** अमेरिका आणि इराण हे युद्ध समाप्तीच्या समीप आले असून 'एक्सिओस'ने अमेरिकन अधिकारी आणि संबंधित सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने इराणसोबतचे युद्ध संपवण्यासाठी आणि व्यापक अणू चर्चेसाठी एका पानाचा सामंजस्य करार (चजण) करण्याच्या अंतिम टप्प्यात आहे.

रिपोर्टनुसार, प्रस्तावित आराखड्यात १४ मुद्द्यांचा समावेश असलेला एक पानाचा चजण तयार करण्यात आला आहे. याचा मुख्य उद्देश तात्काळ युद्धबंदी लागू करणे आणि पुढील ३० दिवसांत पूर्ण कराराला अंतिम स्वरुप देणे असा आहे. या अंतर्गत इराण आपल्या युरेनियम संवर्धन कार्यक्रमाला अल्पकाळासाठी स्थगिती देण्यास तयार झाला आहे. त्या बदल्यात, अमेरिका इराणवरील निर्बंध हटवण्याची आणि इराणची अब्जावधी डॉलर्सची गोठवलेली मालमत्ता मुक्त करण्याची प्रक्रिया सुरू करेल. दोन्ही देश 'होर्मुज सामुद्रधुनी'मधील तणाव कमी करण्यासाठी आणि सागरी जलमार्गातील अडथळे दूर करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करतील. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, अनेक महत्त्वाच्या अटी पुढील चर्चेवर अवलंबून आहेत. त्यामुळे पुन्हा संघर्ष किंवा प्रदीर्घ अनिश्रि्चततेचा धोका कायम आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुज सामुद्रधुनीतील लष्करी हालचाली कमी करण्याचा घेतलेला अलीकडील निर्णय याच राजनैतिक प्रयत्नांचा परिणाम आहे. याचे नेतृत्व अमेरिकन दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर करत आहेत, जे थेट आणि मध्यस्थांच्या माध्यमातून तेहरानच्या संपर्कात आहेत. संबंधित कराराला औपचारिक स्वरूप प्राप्त झाले, तर ती अधिकृतपणे 'युद्ध समाप्तीची' घोषणा असेल आणि पुढील तांत्रिक चर्चा इस्लामाबाद किंवा जिनिव्हा येथे हलवण्यात येतील.

इराणच्या युरेनियम संवर्धनावर घालण्यात येणाऱ्या स्थगितीचा कालावधी हा वादाचा मुख्य विषय आहे. अमेरिका यासाठी २० वर्षांचा कालावधी इच्छित आहे, इराणने ५ वर्षांचा प्रस्ताव दिला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दोन्ही पक्ष १२ ते १५ वर्षांच्या दरम्यान तडजोड करू शकतात. इराणने अटींचे उल्लंघन केल्यास स्थगितीचा कालावधी आपोआप वाढेल, अशी यंत्रणाही अमेरिकेला हवी आहे.



## 'थलापती' विजयकडून सरकार स्थापनेचा दावा

**वृत्तसंस्था**

**चेन्नई :** तमिळनाडूच्या राजकारणात सध्या मोठी उलथापालथ पाहायला मिळत असून, अभिनेता विजय यांच्या नेतृत्वाखालील 'तमिळगा वेत्री कळघम' (ढतघ) पक्षाचे सरकार सत्तेवर येणे आता जवळपास निश्रि्चत मानले जात आहे. आज विजय यांनी राज्यपाल राजेंद्र विश्र्वनाथ आर्लेकर यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ७ मे रोजी म्हणजे उद्याच चेन्नई येथील नेहरू स्टेडियमवर हा शपथविधी सोहळा पार पडण्याची शक्यता आहे.



तमिळनाडूमध्ये विधानसभेच्या एकूण २३४ जागांपैकी विजय यांच्या टीव्हीके पक्षाने १०८ जागा जिंकून सर्वात मोठ्या पक्षाचा बहुमान मिळवला आहे. मात्र, विजय यांनी दोन जागांवर विजय मिळवल्यामुळे त्यांना एक जागा सोडावी लागेल, ज्यामुळे पक्षाचे संख्याबळ १०७ वर येईल. राज्यात सत्ता स्थापनेसाठी ११८ आमदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. हे संख्याबळ पूर्ण करण्यासाठी विजय यांनी इतर पक्षांशी बोलणी सुरू केली असून त्यांना काँग्रेसने पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली आहे.

टीव्हीकेने सरकार स्थापनेसाठी काँग्रेसकडे पाठिंबा मागितला होता. त्यानंतर तामिळनाडू काँग्रेसच्या नेत्यांनी ऑनलाईन बैठक घेऊन टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांनी दिली आहे. तमिळनाडूमध्ये काँग्रेसचे ५ आमदार आहेत. या बदल्यात काँग्रेसने मंत्रिमंडळात दोन मंत्रीपदांची मागणी केल्याचे समजते आहे.

काँग्रेस शिवाय, पीएमके कडे ४ आणि एएमएमके कडे १ आमदार आहे. हे पक्ष देखील विजय यांच्या सरकारला पाठिंबा देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या सर्वांच्या सहकार्याने विजय बहुमताचा आकडा पार करतील, असे समजते.

दरम्यान , शपथविधी या सोहळ्यासाठी विजय यांनी वैयक्तिकरित्या राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना फोन करून निमंत्रण दिले आहे, अशी माहिती मिळते आहे. त्यामुळे या सोहळ्याला राहुल गांधी उपस्थित राहण्याची दाट शक्यता असून, यामुळे दक्षिण भारताच्या राजकारणात एक नवीन युती पाहायला मिळू शकते.

## 'त्या' नराधमाला मरेपर्यंत जन्मठेप'

**तभा वृत्तसेवा**



**नाशिक : नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने आज एका नराधमाला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा (खार्जीळीप-ळशपीं) सुनावली आहे. इयत्ता आठवी आणि इयत्ता दहावीत शिकणाऱ्या दोन मुलींवर धमकी देत बळजबरीने अत्याचार केल्याची घटना घडली होती, या प्रकरणात आज नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी चंदर दौलत गांगोडे (वय ३५, रा. डांगराळे, ता. सुरगाणा) यास मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा दिली आहे.**

**आरोपी चंदर गांगोडे याची २०२१ च्या दिवाळीपासून दोन्ही मुलींवर वाईट नजर होती. तुमचे दुसऱ्या मुलांसोबत संबंध आहेत, ते मी तुमच्या घरच्यांना सांगेन अशी धमकी दिली. धमकीच्या बळावर त्याने मुलींना वारंवार वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन त्यांच्यावर अत्याचार केले. सततच्या त्रासाला आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून अखेर दोन्ही पीडित मुलींनी २९ नोव्हेंबर २०२२ रोजी घर सोडून पळून जाण्याचा निर्णय घेतला.**

**दरम्यान, पळून जात असताना एका मुलाने त्यांना हटकले आणि विचारपूस केल्यानंतर घडलेला सर्व धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर पीडित मुलीच्या कुटुंबीयांकडून सुरगाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. खटल्याची सुनावणी जिल्हा सत्र न्यायालयातील न्यायाधीश आर. एन. पांढरे यांच्या न्यायालयात पार पडली.**

**सरकारी पक्षातर्फे ॲड. भानुप्रिया नितीन पेठकर यांनी युक्तिवाद केला. त्यांनी मांडलेले पुरावे आणि साक्षीदारांच्या साक्षी ग्राह्य धरून न्यायालयाने चंदर गांगोडे याला पोक्सो कलम सहा अन्वये मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा, पाच हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद आणि दोन्ही पीडितांना दोन लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत.**

# व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी घेतली पंतप्रधान मोदींची हैदराबाद हाऊसमध्ये भेट

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आलेले व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी आज हैदराबाद हाऊस येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.यानंतर त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, गेल्या वर्षी भारतातून पवित्र बौद्ध अवशेष व्हिएतनामला पाठवण्यात आले होते, तेव्हा दीड कोटीहून अधिक लोकांनी त्यांचे दर्शन घेतले. आपण चंपा सभ्यतेच्या पांडुलिपींचे डिजिटल स्वरूपात जतन करू आणि ही अमूल्य परंपरा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवू.



ते पुढे म्हणाले की, एक दशकापूर्वी माझ्या व्हिएतनाम दौऱ्यादरम्यान व्हिएतनाम हा आसियानमध्ये भारताचा पहिला 'सर्वसमावेशक सामरिक भागीदार' बनला होता. त्यानंतर आपल्या संबंधांमध्ये सर्व क्षेत्रांत वेगाने प्रगती झाली आहे. आपल्या संस्कृतींबरोबरच व्यापार, तंत्रज्ञान आणि पर्यटन क्षेत्रातील संबंधही अधिक मजबूत झाले आहेत. या भक्कम पायावर पुढे जात आज आपण आपल्या संबंधांना 'आधुनिक सर्वसमावेशक सामरिक भागीदारी'च्या स्तरावर नेत आहोत. गेल्या दशकात भारत-व्हिएतनाम द्विपक्षीय व्यापार दुप्पट होऊन १६ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचल्याचेही त्यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदी यांनी हैदराबाद हाऊसमध्ये राष्ट्राध्यक्ष लाम यांच्यासोबत बैठक घेतली. त्याआधी राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात त्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले, ज्यातून त्यांच्या भारतातील पहिल्या राजकीय दौऱ्याची सुरुवात झाली.

व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष यांचे स्वागत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. हा समारंभ दोन्ही देशांमधील वाढत्या सामरिक भागीदारीचे प्रतीक होता. स्वागत सोहळ्यात मुलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून भारत आणि व्हिएतनामचे राष्ट्रीय ध्वज फडकवले.

राष्ट्राध्यक्ष तो लाम मंगळवारी भारतात दाखल झाले आणि सर्वप्रथम बोधगया येथे जाऊन महाबोधी मंदिरात पूजा केली. बिहारमध्ये त्यांचे स्वागत मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी केले. त्यानंतर ते दिल्लीत आले, जिथे विमानतळावर केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी त्यांचे स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्यात अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. यात द्विपक्षीय संबंध, प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींचा समावेश असेल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू याही त्यांची स्वतंत्र भेट घेणार आहेत. याशिवाय अनेक वरिष्ठ अधिकारी त्यांची भेट घेणार आहेत.

औपचारिक बैठकींपूर्वी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी राष्ट्राध्यक्ष तो लाम यांची भेट घेऊन दोन्ही देशांमधील मजबूत भागीदारीवर चर्चा केली. परराष्ट्र मंत्रालयानुसार हा दौरा विशेष आहे, कारण भारत आणि व्हिएतनाम त्यांच्या सामरिक भागीदारीची १० वर्षे पूर्ण करत आहेत. तो लाम ७ मेपर्यंत भारतात राहणार असून ते व्हिएतनामच्या कम्युनिस्ट पक्षाचे महासचिवही आहेत.

या दौऱ्यात ते मुंबईलाही भेट देणार असून, तेथे नॅशनल स्टॉक एक्सचेंज (छडए) मध्ये आयोजित व्यावसायिक कार्यक्रमात सहभागी होतील आणि आर्थिक संबंध अधिक बळकट करण्यासाठी चर्चा करतील. भारत आणि व्हिएतनाम यांच्यात दीर्घकाळापासून ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंध असून, ते आता मजबूत सामरिक भागीदारीत रूपांतरित झाले आहेत.

## इयत्ता २ री, ३ री, ४ थी आणि ६ वीचा अभ्यासक्रम बदलला; जून २०२६ पासून नवीन पुस्तके

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** महाराष्ट्रातील इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या नवीन अभ्यासक्रम आराखड्याला मंजुरी दिल्यानंतर राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमासाठीच्या राज्यस्तरीय सुकाणू समितीने इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रम आराखड्याला मंजुरी दिली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रम आराखड्याला मंजुरी देण्यात आली. आता येत्या शैक्षणिक वर्षापासून हे नवीन बदल अंमलात आणले जाणार आहेत.

यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह, राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे (एससीईआरटी) संचालक डॉ. हेमंत वसेकर, बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक, शिक्षण संचालक (माध्यमिक) महेश पालकर, शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांच्यासह सुकाणू समितीचे सदस्य उपस्थित होते.

येत्या जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रापासून दुसरी, तिसरी आणि चौथीसोबतच सहावीचाही नवीन अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार काठिण्यपातळी निश्रि्चत करुन अध्ययन निशपत्तीवर आधारित अभ्यासक्रम आराखडा ठरविण्यात आला आहे. यास राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यानंतर या प्रारूपाला शालेय शिक्षण आयुक्तांकडे असलेल्या अभ्यासक्रम समन्वय समितीकडून मंजुरी मिळाल्यानंतर त्यासाठीची पाठ्यपुस्तके बालभारतीकडून तातडीने तयार करून ती येत्या शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीपर्यंत उपलब्ध करुन दिली जातील.

## अकोल्यात आजोबाकडून चिमुरडीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**अकोला :** पुण्यात चिरमुरडीवर अत्याचार झाला आणि तिची हत्या झाली या घटनेच्या धक्कातून राज्य सावरत नाही तोच अकोल्यातून धक्कादायक बातमी आली आहे. अकोल्यात ६० वर्षाच्या वृद्धाने स्वतःच्या नातीवर अत्याचार केल्याचे समोर आले आहे.

सदर घटना अकोल्याच्या पातूर तालुक्यातील आहे. मिळालेल्या माहितीनुसार पीडित मुलीचे आईवडील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत होते. आई वडील कामावर जायचे. मुलगी घरी एकटीच असायची. याच गोष्टीचा गैरफायदा घेत आरोपीने मुलीवर अत्याचार केले. चिमुरडीवर सलग पाच दिवस अत्याचार झाले. वृद्धाने दाखवलेल्या भीतीमुळे मुलीने आई वडिलांना सांगायची हिंमत केली नव्हती. पण सततचे अत्याचार मुलीला सहन नाही झाले, तिने शेवटी आई वडिलांना सर्व सांगितले आणि आई वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकली. पीडित मुलीला घेऊन आई वडिलांनी तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेतली.

## मणिपाल हॉस्पिटलमध्ये बहुविभागीय जटिल शस्त्रक्रियेद्वारे यशस्वी उपचार

अहिल्यानगर : मणिपाल हॉस्पिटल, बाणेर, पुणे येथील ऑर्थोपेडिक सर्जनांनी ४५ वर्षीय पुरुष रुग्णावर यशस्वी उपचार केले. रुग्णाच्या उजव्या वरच्या हातात तीव्र सूज आणि ताण जाणवत होता. यामागील कारण म्हणजे हाडांच्या असामान्य वाढीमुळे प्रमुख शिरेवर आलेला दुर्मिळ प्रकारचा दाब होय. या प्रकरणाविषयी बोलताना डॉ. श्रीकांत मडीकट्ट, कन्सल्टंट – ऑर्थोपेडिक, मणिपाल हॉस्पिटल, बाणेर म्हणाले, "सीटी स्कॅनद्वारे पुढील तपासणीत उजव्या बाजूच्या कॉलर बोनच्या (क्लॅव्हिकल) आतील भागात अतिरिक्त हाडांची असामान्य वाढ आढळली. ही वाढ उजव्या हाताला रक्तपुरवठा करणाऱ्या प्रमुख रक्तवाहिन्यांवर दाब टाकत होती, ज्यामुळे शिरांमधील रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होऊन लक्षणे दिसत होती."ते पुढे म्हणाले,

## दम्याच्या चांगल्या परिणामांची गुरुकिल्ली दैनंदिन नियंत्रक उपचार घेणे ही आहे

छत्रपती संभाजीनगर : जागतिक दमा दिन 2026 रोजी, जेव्हा जीना (ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर अस्थमा) दाहशामक श्वासावाटे घ्यायच्या (इनहेल्ड) औषधांच्या उपलब्धतेच्या गरजेकडे लक्ष वेधत आहे,लक्षणांवर आधारित उपचारांच्या पलीकडे जाण्याच्या गरजेवर जोर देत, डॉ. सचिन एस. जोशी, छातीरोग तज्ज्ञ व अतिदक्षता तज्ज्ञ म्हणाले: "दमा हा श्वसनमार्गातील दाह (सूज) मुळे होणारा एक सामान्य दीर्घकालीन फुफ्फुसांचा आजार आहे, याच्या लक्षणांमध्ये सामान्यतः श्वास घेताना घरघर आवाज येणे, धाप लागणे, छातीत जडपणा जाणवणे आणि खोकला येणे यांचा समावेश असतो, ज्यांचा कालावधी आणि तीव्रता वेगवेगळी असू शकते. या लक्षणांचे आणि मूळ दाहाचे व्यवस्थापन करण्यासाठी अनेकदा श्वसन उपचार (इनहेलेशन थेरपी) चा वापर केला जातो, ज्यामध्ये औषध थेट श्वासनलिकेत पोहोचवले जाते, फुफ्फुसांना लक्ष्य केले जाते आणि शरीराच्या इतर भागांवरील परिणाम कमी केले जातात. उपचारांमध्ये सामान्यतः तात्काळ लक्षणांपासून आराम मिळवण्यासाठी आराम देणारी औषधे (रिलीव्हर्स) आणि दीर्घकालीन व्यवस्थापनासाठी नियंत्रक औषधे यांचा समावेश असतो.

## बँकिंगसाठी व्यवसाय अनुभव ही पुढील सीमा

पुणे : भारतीय बँकिंग क्षेत्रात शांत क्रांती होत आहे. गेल्या दशकात, आम्ही "फ्रंट-एंड" मध्ये गुंतलो होतो, ज्यात आकर्षक ॲप्स, 10-सेकंदांचे कर्ज मंजूर करणे आणि घर्षणरहित यूपीआय पेमेंट्स यांचा समावेश होता. आम्ही स्क्रीनवर सोयीस्करता निर्माण केली. परंतु 2030 कडे पाहताना, स्पर्धात्मक युद्धभूमी बदलत आहे. जिथे प्रत्येक निओ-बँक आणि फिनटेक सुंदर इंटरफेस देतात, तिथे "ग्राहक अनुभव" सामान्य झाला आहे. आता खरा फरक म्हणजे मी ज्याला व्यवसाय अनुभव म्हणतो: अदृश्य, लवचिक यंत्रणा जी आम्ही आमच्या ग्राहकांना दिलेल्या वचनाला शक्ती देते - श्री. लक्ष्मण वेलायुथम, प्रमुख – मुख्य विपणन अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक फ्रंट-एंडचा भ्रम- बँकिंग ॲपला लक्झरी कारच्या डॅशबोर्डसारखे समजा. ते भव्य दिसते, परंतु जर इंजिन (आमची मुख्य बँकिंग प्रणाली) बिघडले किंवा सुरक्षा प्रणाली (अनुपालन आणि सायबरसुरक्षा) अयशस्वी झाली, तर ड्रायव्हिंगचा अनुभव कोसळतो. ग्राहक-केंद्रित चॅनेल मुख्य बँकिंग प्रणाली, अनुपालन फ्रेमवर्क, सायबरसुरक्षा नियंत्रणे आणि सेवा वर्कफ्लो यांच्या समन्वयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात.

## आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्सने नवीन शाखा उघडून आपली पकड अधिक मजबूत केली

लातूर: आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडची उपकंपनी आणि गृहनिर्माण क्षेत्रातील आघाडीची वित्त पुरवठादार कंपनी असलेल्या आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडने (एबीएचएफएल) आपल्या देशव्यापी वितरण जाळ्याचा विस्तार करण्याच्या योजनेचा भाग म्हणून महाराष्ट्रातील लातूरमध्ये नवी शाखा सुरु करून महाराष्ट्रात अजून एक पुढचे पाऊल उचलले आहे. या नवीन शाखेसह, महाराष्ट्रातील आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडच्या शाखांची एकूण संख्या आता ३२ झाली आहे. यामुळे वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमधील कंपनीची पकड अधिक घट्ट झाली असून ग्राहकांना देखील सेवा मिळवणे अधिक सोपे झाले आहे.

## छंद जीवन समृद्ध करणारे — सुधीर कोर्टीकर



छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा : सिडको एन-४ येथील दर्पण हॉलमध्ये 'कलारंग'तर्फे आयोजित मोफत उन्हाळी शिबिराचे उद्घाटन रविवारी (३ मे) ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध गायिका सारिका कुलकर्णी होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून आर्किटेक्ट विकास कुलकर्णी उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय वैशाली जोशी यांनी करून दिला. यावेळी मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

उद्घाटन प्रसंगी बोलताना सुधीर कोर्टीकर यांनी विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच कला आणि छंद यांचेही संवर्धन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. "बालपणी जोपासलेले छंद व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात आणि तेच पुढे जीवन समृद्ध व सुजलाम-सुफलाम बनवतात," असे ते म्हणाले.

यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या हस्तकला आणि रांगोळी काढण्याचे प्रात्यक्षिक देत मार्गदर्शन केले. तसेच प्राणी, पक्षी आणि वाहनांचे आवाज कसे काढावेत, याचेही प्रात्यक्षिक दाखवले. विद्यार्थ्यांनीही तत्काळ उत्कृष्टरीत्या आवाज काढून उपस्थितांना आश्चर्यचकित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका मोहरीर यांनी केले, तर प्रसाद जोशी यांनी आभार मानले. या उन्हाळी शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, शिबिराद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत आहे.

## 'जाने अनजाने हम मिले' मालिकेचा 500 भागांचा टप्पा; कलाकारांचा आनंदोत्सव

छत्रपती संभाजीनगर : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जाने अनजाने हम मिले' ने नुकताच 500 भागांचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. गोल्डी बेहल आणि सोनल ए. कक्कर निर्मित या मालिकेने नोव्हेंबर 2024 पासून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत भावनिक कथा आणि आकर्षक सादरीकरणामुळे विशेष स्थान निर्माण केले आहे.

शारदा (जयती भाटिया), राघव (भरत अहलावत) आणि रीत (आयुषी खुराणा) यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरल्या आहेत. मालिकेतील कलाकारांची केमिस्ट्री आणि कथानकातील वळणांमुळे ही मालिका घराघरात लोकप्रिय ठरली आहे.

या खास प्रसंगी कलाकार आणि तंत्रज्ञांनी सेटवर केक कापून आनंद साजरा केला. भरत अहलावत म्हणाले की, हा प्रवास त्यांच्यासाठी अविस्मरणीय असून प्रेक्षकांचे प्रेम हेच खरे यश आहे.

# फर्दापूर येथे शेतकऱ्यावर रानडुक्कराचा भीषण हल्ला; गंभीर जखमी, परिसरात भीतीचे वातावरण



**फर्दापूर सोयगाव,** | तालुक्यातील फर्दापूर येथे सोमवारी सकाळच्या सुमारास एका शेतकऱ्यावर रानडुक्कराने अचानक हल्ला करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जहूर कादरी (वय ३८, रा. फर्दापूर) हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतात शेतीची कामे करण्यासाठी गेले होते. सकाळच्या वेळेत ते शेतात काम करत असताना अचानक जवळील दाट झुडपातून एक रानडुक्कर बाहेर येत त्यांच्या दिशेने धावून आले. कोणतीही पूर्वकल्पना नसल्याने कादरी यांना स्वतःचा बचाव करण्याची संधीही मिळाली नाही.

रानडुक्कराने जोरदार धक्का देत त्यांना खाली पाडले व त्यानंतर वारंवार हल्ला करत त्यांना गंभीर जखमी केले. विशेषतः पायावर आणि पोटरीवर त्याने तीव्र प्रहार केल्यामुळे कादरी यांना मोठ्या प्रमाणावर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांनी मदतीसाठी आरडाओरडा केल्यानंतर शेजारील शेतकरी तात्काळ घटनास्थळी धावून आले. त्यांनी धैर्याने रानडुक्कराला हुसकावून लावत जखमी शेतकऱ्याची सुटका केली.

यानंतर जखमी जहूर कादरी यांना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत त्यांच्या उजव्या पायाच्या अंगठ्याला फ्रॅक्चर झाल्याचे निष्पन्न झाले असून पायाच्या पोटरीवर खोल जखमा झाल्या आहेत. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी करून पंचनामा केला असून पुढील कार्यवाही सुरू आहे. दरम्यान, या भागात रानडुक्करांचा वावर वाढल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून, वारंवार अशा घटना घडत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

स्थानिक शेतकऱ्यांनी वनविभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. रानडुक्करांचा बंदोबस्त करणे, शेतांभोवती सुरक्षित कुंपण उभारणे तसेच अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतात काम करताना अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# ग्रामसेवकांनी फोन उचलावेत; महिनाभरात एकाच मार्गावरील गावे द्या : आमदार संजना जाधव

### तालुक्यातील २१० गावांच्या पाणी टंचाईचा पंचायत समितीत आढावा

**तभा वृत्तसेवा**

कन्नड : दि.०६ मे- तालुक्यात वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या पाणी टंचाईच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पंचायत समिती सभागृहात बुधवारी विशेष आढावा बैठक पार पडली. बैठकीत तालुक्यातील १४२ ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या २१० गावांच्या पाणी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



या बैठकीला आमदार संजना जाधव, तहसीलदार सारिका भगत, पंचायत समिती सभापती सुप्रिया घुगे, उपसभापती माया सुरासे, प्रभारी गटविकास अधिकारी विजयकुमार पंडित, उपविभागीय अभियंता माधुरी नांद्रे, ग्रामसेवक संघटनेचे बापू काळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पाणी टंचाईग्रस्त गावांमध्ये सुरू असलेल्या विहीर अधिग्रहण, टँकर प्रस्ताव, जलजीवन मिशन योजनांची सद्यस्थिती तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासनाकडून सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार तालुक्यात १६ विहीर अधिग्रहण प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ९ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच तहसील कार्यालयामार्फत ७ टँकर प्रस्ताव प्राप्त झाले असून काही गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

यावेळी आमदार संजना जाधव यांनी ग्रामपंचायतींच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली. अनेक ग्रामसेवकांकडे दोन ते तीन गावांचा अतिरिक्त कार्यभार असल्याने गावांच्या समस्या वेळेत सोडविणे कठीण होत असल्याचे निदर्शनास आले. काही गावांमधील अंतर मोठे असल्याने ग्रामसेवकांना नियमित उपस्थित राहणे अवघड जात असल्याचेही बैठकीत समोर आले.

यावर आमदार जाधव यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना देत, "ज्या ग्रामसेवकांकडे तीन गावांचा कार्यभार आहे, त्यांना पुढील एक महिन्याच्या आत एकाच मार्गावरील किंवा जवळच्या गावांचा कारभार देण्यात यावा, जेणेकरून नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडविता येतील," असे निर्देश दिले.

दरम्यान, ग्रामसेवक नागरिकांचे तसेच लोकप्रतिनिधींचे फोन घेत नसल्याच्या तक्रारींवरूनही त्यांनी नाराजी व्यक्त केली. "कामाच्या वेळी फोन उचलणे ही जबाबदारी आहे. नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन तत्काळ प्रतिसाद द्यावा," असे सांगत त्यांनी स्वतःचा संपर्क क्रमांकही अधिकाऱ्यांना दिला.

बैठकीस कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र चव्हाण, वरिष्ठ सहाय्यक विजय वासने, तलाठी दीपक एरंडे, सभापती डॉ. मनोज राठोड, ज्ञानेश्वर निकम, जयेश बोरसे, आदित्य गर्जे, ललित सुरासे, पंचायत समिती सदस्य सिद्धेश्वर झालटे, अरविंद राठोड यांच्यासह ग्रामसेवक, कर्मचारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एमजीएममध्ये 'पेट केअर'ची सुरूवात

### पाळीव प्राण्यांसाठी आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर, दि.६ : शहरातील पशुप्रेमी नागरिकांसाठी आनंदाची बातमी असून महात्मा गांधी मिशनतर्फे 'एमजीएम पेट केअर' या अत्याधुनिक पेट क्लिनिकची सुरूवात करण्यात आली आहे. गांधेली येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सुरू होणाऱ्या मराठवाड्यातील पहिल्या एमजीएम डॉ.राजेंद्र सुर्यवंशी पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या अंतर्गत हे क्लिनिक कार्यरत करण्यात आले आहे.

एमजीएम क्रिकेट स्टेडियम परिसरातील इमारतीमध्ये सुरू झालेल्या या पेट क्लिनिकमुळे शहरातील श्वानप्रेमी व पशूप्रेमींना त्यांच्या प्राण्यांसाठी एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यावर या केंद्राचा भर असणार आहे.

एमजीएम पेट केअरमध्ये पाळीव प्राण्यांची नियमित आरोग्य तपासणी, विविध रोगांचे निदान व उपचार, लसीकरण, शस्त्रक्रिया, रक्त तपासण्या, जंतनाशक औषधोपचार तसेच बाह्य परोपजीवी निर्मूलन यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याशिवाय पाळीव प्राण्यांसाठी लागणारी सर्व प्रकारची औषधेही येथे सहज उपलब्ध आहेत, ज्यामुळे नागरिकांना वेगवेगळ्या ठिकाणी धावपळ करावी लागणार नाही.

हे क्लिनिक दररोज सकाळी ९:३० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहणार असून कामकाजाची वेळ नागरिकांच्या सोयीप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, लवकरच या केंद्रात एक्स-रे, सोनोग्राफीसह इतर अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू असून त्यामुळे एमजीएम पेट केअर हे शहरातील एक आधुनिक व सर्वसमावेशक पशुवैद्यकीय केंद्र म्हणून विकसित होणार आहे. एमजीएमच्या या उपक्रमामुळे शहरातील पाळीव प्राण्यांच्या आरोग्यसेवेला नवी दिशा मिळणार असून पशुप्रेमी नागरिकांकडून या सुविधेचे स्वागत करण्यात येत आहे.

# ऑनलाईन नोंदणी करूनही हरभरा खरेदी ठप्प; इस्लापूरमध्ये शेतकऱ्यांचा संताप उसळला!

**तभा वृत्तसेवा**

**ईस्लापूर प्रतिनिधी** | इस्लापूर येथील शासकीय धान्य खरेदी केंद्र (नाफेड) गेल्या महिनाभरापासून बंद असल्याने ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली असून त्यांची फसवणूक झाल्याची चर्चा शेतकऱ्यांमध्ये रंगत आहे. खरे शेतकरी असूनही हरभऱ्याची खरेदी होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.




किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील धान्य खरेदी केंद्र मार्च व एप्रिल महिन्यात नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांसाठी कार्यरत असणे अपेक्षित होते. शासनाच्या नियमानुसार अनेक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून प्रक्रिया पूर्ण केली होती. इतकेच नव्हे, तर काही शेतकऱ्यांना खरेदीसाठी संदेश (SMS) देखील प्राप्त झाले होते. मात्र प्रत्यक्षात शेतकरी हरभरा घेऊन केंद्रावर पोहोचल्यावर केंद्र बंद असल्याचे त्यांना पाहायला मिळाले.

यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड गैरसोय होत असून, शासनाच्या यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. "नोंदणी करा, मेसेज मिळेल आणि खरेदी होईल" या आश्वासनांवर विश्वास ठेवून शेतकरी हरभरा साठवून बसले, पण प्रत्यक्षात खरेदी बंद ठेवून प्रशासनाने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याचा आरोप होत आहे.

या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यावर "टार्गेट पूर्ण झाल्यामुळे खरेदी बंद करण्यात आली आहे" अशी माहिती देण्यात येत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

*अधिकाऱ्यांचे म्हणणे*

"टार्गेट पूर्ण झाल्याने खरेदी सध्या बंद आहे. शेतकरी येत नसल्याने आधी नोंदणी करून घ्यावी लागते. पुढील आदेश किंवा मुदतवाढ मिळाल्यास खरेदी सुरू केली जाईल," असे विभागीय उपसरव्यवस्थापक बदनाळे यांनी सांगितले.

*शेतकऱ्यांचे अनुभव*

शामराव पवार (इस्लापूर) म्हणाले,

"मी 28 मार्च रोजी ऑनलाईन नोंदणी केली. 12 एप्रिलला मेसेज आला म्हणून हरभरा घेऊन गेलो, पण केंद्र बंद होते. गेल्या पंधरा दिवसांपासून हीच स्थिती आहे."

नामदेव मौला गडपाळे (मुळझरा) यांनी सांगितले,

"25 एप्रिलला मेसेज आला म्हणून हरभरा घेऊन गेलो, पण केंद्र बंद होते. फोनवर वेगवेगळ्या तारखा सांगितल्या जात आहेत. ऑनलाईन नोंदणी करूनही खरेदी न झाल्याने आमची फसवणूक झाली असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी."

*प्रशासनाचा गोंधळ की शेतकऱ्यांची फसवणूक?*

एकीकडे शेतकऱ्यांना मेसेज पाठवले जात आहेत, तर दुसरीकडे केंद्र बंद ठेवले जात आहे. "टार्गेट पूर्ण" हा कारण पुढे करून शेतकऱ्यांना परत पाठवले जात असल्याने हा प्रकार नियोजनशून्यतेचा की जाणीवपूर्वक दुर्लक्षाचा, असा सवाल उपस्थित होत आहे.

शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेचा लाभ मिळावा म्हणून शेतकरी नियम पाळून नोंदणी करतात, मात्र त्याच योजनेत प्रशासनाचा ढिसाळ कारभार शेतकऱ्यांच्या विश्वासाला तडा देत आहे.

शेतकऱ्यांची ठाम मागणी

इस्लापूर येथील खरेदी केंद्र तात्काळ सुरू करून ऑनलाईन नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी करावी. तसेच, या प्रकरणात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची पणन महासंघाकडून सखोल चौकशी करून कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी संतप्त शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.

*"नोंदणी करूनही खरेदी नाही, मग ही योजना नेमकी कोणासाठी?"* — असा थेट सवाल आता इस्लापूरमधील शेतकरी प्रशासनाला विचारत आहेत.

# कंधार तालुक्यात बियाणे, खतांची जादा दराने विक्री केल्यास करणार कठोर कारवाई:तालुका कृषी अधिकारी गणेश यादव

**फूलवळ प्रतिनिधी** | खरीप हंगाम जून 2026 पासून सुरू होत आहे. या अनुषंगाने कंधार तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी स्वाती टेळे मॅडम आणि गणेश यादव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कंधार येथे तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र चालकांची बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये साथी ॲप वापरणे बंधनकारक आहे. तसेच साथी ॲपवरूनच शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात यावे. येणाऱ्या खरीप हंगामामध्ये आपल्या तालुक्याला लागेल तेवढा खत आणि बियाण्याचा योग्य साठा उपलब्ध करून देण्यात येईल असे ही या प्रसंगी बोलताना सांगितले.

खते आणि बियाणे जादा दराने विक्री केली जात आहेत. अशा विक्रेत्यांवर कारवाई केली जाईल. असा इशारा कंधार तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी गणेश यादव यांनी दिला.

या बैठकीला मंडळ कृषी अधिकारी स्वाती टळे, कृषी सहायक विनोद पूलकुंडवार, संघटनेचे तालुकाप्रमुख भगवान डफडे यांच्यासह तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालक उपस्थित होते.

पुढे बोलताना तालुका कृषी अधिकारी गणेश यादव म्हणाले की, यंदा युरिया, डीपीए, या रासायनिक खतांची २२ हजार ९५७ मेट्रिक टन इतकी मागणी केली. शिवाय मागील रब्बी हंगामामधील काही प्रमाणात खत साठा विक्रेत्यांकडे उपलब्ध असल्याने या खरीप हंगामात खताची कमतरता भासणार नाही. तर प्रत्येक कृषी सेवा केंद्रनिहाय नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# उर्ध्व मानार प्रकल्पातून आज पासून शेवटची पाणी पाळी

### आ. चिखलीकर यांच्या प्रयत्नातून शेतकऱ्यांचे होणार हित



नांदेड : उन्हाळी हंगामासाठी शेतकऱ्यांच्या पिकांना पुरेसे पाणी मिळावे , पशु प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठपुराव्यातून उर्ध्व मानार प्रकल्प लिंबोटी धरणातून शेवटच्या पाणी पाळीला आज पासून सुरुवात होत आहे. शेतकरी व संबंधितांनी दक्ष राहण्याच्या सूचना आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यातून देण्यात आले आहे.

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लिंबोटी धरण उभारले. या धरणातून दरवर्षी शेतकऱ्यांना उन्हाळी पिकांसाठीही पाणी सोडले जाते. यावर्षीचे हे दुसरे आणि शेवटचे आवर्तन असणार आहे . दिनांक 6 मे ते 16 मे पर्यंत पाणी पाळी सुरू असणार असून शेतकऱ्यांनी या पाणी पाळीचा लाभ घेऊन आपल्या पिकांचे संवर्धन करावे. पशु प्राण्यांच्या पिण्याच्या प्रश्न मार्गी लावावा असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

# पंचशील शाळेची कु.आरती शिंदे हदगाव-हिमायतनगर तालूक्यातून सर्व प्रथम

### विज्ञान शाखेचा ९१ तर कला शाखेचा ८३ टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**

**हदगाव दि.६ मे** | शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता बारावीच्या ऑनलाईन निकालात विज्ञान शाखेचा निकाल ९१ टक्के तर कला शाखेचा निकाल ८३% लागला असून शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

विज्ञान शाखेतून कु. आरती दत्ता शिंदे ८६.३३ टक्के गुण मिळवून हदगाव-हिमायतनगर या दोन्ही तालुक्यतून सर्वप्रथम आली आहे. कु.पूजा शिवाजी वाघमारे ७४.६७,कु.प्रज्ञा सत्यप्रकाश कुंभकर्ण ७२.६७,शुभम शंकर राठोड ७१.३३ गुण प्राप्त करून अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.



तर कला शाखेतून गंगाराम दिगंबर धाडे ८०.१७, कु.पल्लवी रावसाहेब वानखेडे ७८.३३,कु.प्रज्ञा प्रदीप पाईकराव ७७.८३,अभय गौतम काळबांडे ७६.१७ तर कु.दिपाली बालाजी गायकवाड ७५.८३ टक्के गुण प्राप्त करून अनुक्रमे प्रथम,दुतीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले सह सर्व संचालक मंडळ तसेच प्राचार्य अनिल दस्तूरकर सह उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा.राजेश घाटे,प्रा प्रकाश देशमुख,प्रा. हापसे,प्रा.सोनूले,प्रा.गुंडे,प्रा. पानपट्टे,प्रा.चव्हाण, प्रा. विजयकुमार खिसे,प्रा.राठोड, प्रा.श्रीमती खुळे,श्रीमती पावडे,श्रीमती पतंगे,पुरुषोत्तम धुळे यांनी अभिनंदन केले आहे.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

**// जाहीर प्रगटन//**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ८९/२०२६

अर्जदार:- १. शालुबाई संपत साळवे, वय ५५ वर्षे, रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ह.मु. भांडुप मुंबई.

विरुध्द

गैरअर्जदारः- निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

वारस सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डि.आर. सुर्यवंशी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत शंकर दगडू साळवे (सासरे) हे दि. १०/०५/१९६८, पिकाबाई शंकर साळवे (सासू) ह्या दिनांक ०४/०९/१९८७ रोजी पळसखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर व संपत शंकर साळवे (पती) हे दिनांक २३/०२/२०२६ रोजी उपचारा दरम्यान मुंबई येथील रुग्णालयात मृत्यू झाला व अंत्यविधी पळसखेडा, ता. सोयगांव, जि छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत शंकर दगडू साळवे, भिकाबाई शंकर साळवे व संपत शंकर साळवे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख - १३/०६/२०२६.

आज दि. ०६/०५/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ■ व्यापाऱ्यांनी अतिक्रमणे काढून घेण्याचे मनपाचे आवाहन ■

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** येथील गंजगोलाई परिसरातील व्यापारी, गाळेधारक व फेरीवाल्यांनी केलेली अतिक्रमणे तात्काळ काढून घ्यावीत अन्यथा मनपाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अतिक्रमण हटाव मोहीम मोहिमेत ती काढून टाकण्यात येतील, असा इशारा महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

मनपाच्या वतीने व्यापाऱ्यांना कळविण्यात आले आहे की, आज गुरुवार दि. ७ मे व शुक्रवार दि. ८ मे रोजी गंजगोलाई परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे. तत्पूर्वी फेरीवाले, व्यापारी व गाळेधारकांनी आपल्या दुकानासमोर उभे केलेले अँगल, लोखंडी पत्रे, नालीवर बांधलेले कट्टे किंवा इतर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण तात्काळ काढून घ्यावे.

आज राबविण्यात येणाऱ्या मोहिमेत सर्व प्रकारची अतिक्रमणे काढून टाकली जाणार आहेत. ही कारवाई टाळण्यासाठी व्यापाऱ्यांनी स्वतः होऊन अतिक्रमणे काढून घ्यावीत आणि सहकार्य करावे, असा इशाराही महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.



## विविध वृत्त...

### किरकोळ कारणावरून एकास काठीने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** जुन्या भांडणाची कुरापत काढून संगणमत करून तिघांनी मिळून एकाला काठीने, लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करून जखमी केल्याची घटना अहमदपूर येथे रविवारी (दि.३) रात्री दहा वाजेच्या सुमारास घडली.

आरोपी झहीद उमरखाँ पठाण हा अन्य दोघांना सोबत घेऊन फिर्यादी विकी बालाजी यांच्याकडे बँक कॉलनीतील घराजवळ आला. त्याने मागील भांडणाची कुरापत काढून विकी यांच्यासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानेच हातातील काठीने विकी बालाजी यांना गालावर मारून जखमी केले. अन्य दोन आरोपींनी त्यांना लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करून जखमी केले.

याप्रकरणी विकी बालाजी यांच्या फिर्यादीवरून अहमदपूर पोलीस ठाण्यात आरोपी झहीद पठाण याच्यासह अन्य तिघांवर गुरनं. २६२/२६ कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), (३), ३२४ (४), ३ (५) भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बुरकुले करीत आहेत.

### अंगणवाडी कर्मचाऱ्यांना उन्हाळी सुट्टी देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** अंगणवाडी सेविका व मदतनीसांना उन्हाळी सुट्टी जाहीर करण्याची मागणी होत आहे. सध्या उन्हाळा सुरू झाला असून, शाळांना १ मेपासून सुट्या जाहीर झाल्या. शाळांप्रमाणे अंगणवाडी सेविका व मदतनीसांना उन्हाळी सुट्या अधिकृत जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना उन्हाळा सुरू असला तरी इतर कामे सांगितली जातात. शाळांप्रमाणे सुट्या जाहीर कराव्यात, अशी मागणी आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीसांना देखील उन्हाळी सुट्या जाहीर केल्या पाहिजेत, अशी मागणी होत आहे.

### 'व्हीडीएफ' स्कूलची माजी विद्यार्थिनी राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** विलासराव देशमुख फाऊंडेशन स्कूल ऑफ पॉलीटेक्निकच्या माजी विद्यार्थिनी माधुरी लोमटे हिने महाराष्ट्र शासनाच्या भरती प्रक्रियेत (सीईबीसी) प्रवर्गातून प्रथम क्रमांक पटकावला. यामुळे असिस्टन्ट टाउन प्लॅनर या पदासाठी निवड मिळवून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

शिक्षकांचे योग्य मार्गदर्शनामुळेच हे यश मिळाल्याचे माधुरी लोमटे हिने सांगितले. माधुरी लोमटे हिच्या यशाबद्दल व्हीडीएफ स्कूल ऑफ पॉलीटेक्निक मध्ये विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष आ. अमित देशमुख, विश्र्वस्त विजय देशमुख, समद पटेल, किरण जाधव, रवींद्र काळे, ऋषिकेश पाटील, प्राचार्य राजकुमार साखरे, प्राध्यापक यांनी माधुरीच्या यशाचे कौतुक केले.

### युवकांसाठी कौशल्य विकासाची संधी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना अंतर्गत प्रायोगिक प्रकल्पाच्या विस्तारासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत. योजनेचा मुख्य उद्देश देशातील तरुणांना भारतातील अव्वल कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देणे हा आहे. या प्रायोगिक प्रकल्पांतर्गत १ लाख १० हजार इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून हा प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे.

इंटर्नशिपचा कालावधी हा संबंधित क्षेत्राच्या आणि कंपनीच्या गरजेनुसार असेल. यातील किमान अर्धा कालावधी हा प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी व्यतीत करणे अनिवार्य आहे. या योजनेचा लाभघेण्यासाठी उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षे दरम्यान असावे. हायस्कूल, उच्च माध्यमिक उत्तीर्ण, आयटीआय प्रमाणपत्रधारक, पॉलिटेक्निक डिप्लोमा धारक किंवा पदवीधर बी.ए., बीएस.सी., बीकॉम, बीसीए, बी. फार्मा, बी.ई., बी. टेक. इत्यादी आणि पदव्युत्तर पदवी शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार पात्र आहेत. ही योजना थेट लाभ हस्तांतरण डीबीटी तत्त्वावर आधारित असून उमेदवारांना दरमहा ९ हजार रुपये मानधन दिले जाईल. इच्छुक उमेदवारांना अधिकृत पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी करावी लागेल.

## जलसंधारणाच्या कामांना निधी कमी पडू देणार नाही : संजय राठोड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरण्यासाठी राज्य शासनामार्फत जलयुक्त शिवार अभियान आणि गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान राबविले जात आहे. या अंतर्गत औसा तालुक्यासह लातूर जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले. त्यांनी आज औसा तालुक्यातील फत्तेपूर, दावतपूर, तांबरवाडी, राजेवाडी येथील जलसंधारणाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली.





औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार दिनकर माने, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्यास अडसूळ, औसा पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती चंद्रशेखर सोनवणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी जावेद पटेल, जिल्हा ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षित पवार, टाटा मोटर्स फाऊंडशनचे जिल्हा समन्वयक प्रमाद घायाळ यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

औसा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी प्रत्येक गावात जलसंधारणाची कामे करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी पुढाकार घेतला आहे. पहिल्या टप्प्यात सात गावांची निवड करून या गावांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या संकल्पनेतून जलसमृद्ध औसा अभियान राबविण्यात येत आहे. त्यांचा हा उपक्रम कौतुकास्पद असून या उपक्रमामुळे निर्माण होणारा जलसाठा आणि भूजल पुनर्भरणामुळे भूजल पातळीत वाढ होईल. त्याचा आगामी काळात शेतकऱ्यांना फायद होईल. या गावांमध्ये नवीन बंधारा, बंधारा दुरुस्ती, नाला खोलीकरण यासारख्या कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. गावाचा विकास करण्यात गावकऱ्यांची भूमिका महत्वाची असते. गाव समृद्ध होण्यासाठी गावात जलसंधारणाची जास्तीत जास्त कामे होणे आवश्यक असून यासाठी गावकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री राठोड यांनी केले.

औसा तालुक्यातील भौगोलिक स्थितीमुळे याठिकाणी सिंचनासाठी पाण्याची अपुरी सुविधा आहे. त्यामुळे पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. यावर मात करण्यासाठी तालुक्यात जलसंधारणाची जास्तीत जास्त कामे करून भूजल पुनर्भरण करण्यावर भर देण्यात येत आहे. जलसमृद्ध औसा अभियान अंतर्गत गावांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध योजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येत आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून पहिल्या टप्प्यात तालक्यातील तांबरवाडी,दा वतपुर, महादेववाडी, फत्तेपुर, पारदेवाडी, कवळी (हि.) आणि हिप्परगा(क.) या सात गावांची निवड करण्यात आली आहे. राज्य शासन, टाटा मोटर्स फाउंडेशन, नाम फाउंडेशन आणि क्रिएटिव्ह फाउंडेशन मार्फत या गावांमध्ये जलसंधारणाची कामे सुरु असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी सांगितले. तसेच पुढील टप्प्यात औसा तालुक्यातील सर्वच गावांचा समावेश या गावांमध्ये केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी औसा तालुक्यातील फत्तेपूर येथील सुमारे ७ किलोमीटर नाल्याचे आणि तांबरवाडी, राजेवाडी येथील सुमारे ६ किलोमीटर नाल्याच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाची प्रत्यक्ष पाणी केली. तसेच दावतपूर येथे अभिसरणातून उभारण्यात आलेली अंगणवाडी इमारत, कांदाचाळ, जनावरांचा गोठा यासह विविध विकास कामांची पाहणी केली. तसेच याठिकाणी नाला खोलीकरण कामाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. येथील अमृत तलाव संवर्धन कामाचीही त्यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी, ग्रामस्थांशीही संवाद साधला.

### स्व-गणना प्रक्रिया; सहभाग नोंदवावा : पालकमंत्री भोसले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** जनगणनेसाठी अधिक सुलभआणि जलद सुविधा केंद्र सरकारने प्रथमच उपलब्ध करून दिली आहे. 'स्व-गणना' या सुविधेचा जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घेऊन या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले आहे. शुक्रवारपासून स्व गणनेला सुरुवात झाली आहे. ही स्व-गणना दि. १५ मेपर्यंत नागरिकांना घरबसल्या करता येणार आहे. नागरिकांनी री।।२४२. ५.ल्ल या अधिकृत पोर्टलवर जाऊन कुटुंब प्रमुखाच्या मोबाइल क्रमांकाद्वारे नोंदणी करावी. त्यानंतर कुटुंबाची माहिती भरावी. त्यानंतर येणारा आयडी जपून ठेवावा.

१६ मेपासून शासकीय प्रगणक घरोघरी भेटी देतील, तेव्हा त्यांना केवळ हा आयडी दाखवल्यास जनगणनेची प्रक्रिया तातडीने पूर्ण होणार आहे.

## बुद्ध गार्डनमधून आरोग्याचा संदेश

# मोहिनी निलंगेकर यांचा प्रेरणादायी फिटनेस प्रवास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** शहरातील ओंकार प्रतिष्ठान व अष्टविनायक प्रतिष्ठान संचलित बुद्ध गार्डन येथील भव्य बुद्ध मूर्ती आणि बोधगया येथील पवित्र बोधी वृक्षाची जोपासना यामुळे हे ठिकाण आधीच आध्यात्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या वेगळे स्थान निर्माण करून आहे. आता याच पवित्र स्थळाने आरोग्य आणि फिटनेसच्या क्षेत्रातही एक नवा आदर्श निर्माण केला आहे. बौद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने येथे एक अनोखा विक्रम घडला असून, परिसरातील चित्रकला शिक्षिका मोहिनी दीपरत्न निलंगेकर यांनी स्वतःच्या जिद्दीने आणि सातत्यपूर्ण प्रयत्नाने दोन वर्षांत तब्बल दहा किलो वजन कमी करत थायरॉईडवर नियंत्रण मिळवले आहे. त्यांच्या या परिवर्तनामागे नियमित योग, सूर्यनमस्कार आणि झुंबा यांचा मोठा वाटा आहे. प्रशिक्षणासोबतच मोहिनी यांनी स्वतःचा 'तुलसी फिटनेस' हा उपक्रम सुरू केला. पहाटे ५ वाजता सुरू झालेल्या या मोफत क्लासला सुरुवातीला काही महिला उपस्थित राहू लागल्या, पण पाहता पाहता ३५ ते ५० महिलांनी या उपक्रमात सहभाग घेतला. बुद्ध गार्डनमधील बुद्धगया महिला मंडळाच्या वंदना आणि ध्यान उपक्रमांनीही याला सकारात्मक दिशा दिली.




या उपक्रमाची दखल घेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप राठी यांनी पुढाकार घेत योगाचार्य विष्णू भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसीय मोफत योग शिबिराचे आयोजन केले. या शिबिराला मोहिनी निलंगेकर यांनी सक्रिय सहकार्य केले, तर अंतिम दिवशी प्रीती मिसर यांनी झुंबाचे प्रभावी मार्गदर्शन केले.

समारोप सोहळ्यात लातूर अर्बन बँकेचे चेअरमन आकाश राठी, संचालिका शुभदा रेड्डी आणि अभय शहा यांच्या उपस्थितीत सर्व योग शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी योगाचार्य भुतडा यांनी योग आणि प्राणायामाचे महत्त्व विशद करत, 'नियमित योग हा केवळ शरीरासाठी नव्हे, तर मन आणि आत्म्याच्या संतुलनासाठी अत्यावश्यक आहे,' असे सांगितले. त्यांनी यांच्या योग चळवळीचा उल्लेख करत योगाची जागतिक पातळीवरील वाढती स्वीकारार्हता अधोरेखित केली. बुद्ध गार्डनमधून सुरू झालेली ही आरोग्य चळवळ केवळ लातूरपुरती मर्यादित न राहता, संपूर्ण समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

## अत्याचार व हत्या प्रकरणी त्वरित कारवाई करा

# नसरापूर येथील बालिकेवरील आरोपीला शिक्षाची निवेदनाव्दारे मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे तीन वर्षीय निष्पाप बालिकेवर ६५ वर्षीय व्यक्तीकडून अमानुष पाशवी अत्याचार, बलात्कार करून क्रूर हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटने संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी त्वरित व कठोर कारवाई करण्याची मागणी लातूरकर जनतेने केली आहे.



नसरापूर बालिका अत्याचार व हत्या निषेध कृती समिती, लातूर यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लातूर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, फुले-शाहू-आंबेडकरांची विचारधारा जोपासणाऱ्या, संत ज्ञानेश्र्वर-तुकारामांच्या पावन भूमीत, छत्रपती शिवरायांच्या शिकवणीला काळीमा फासणारी ही घटना महाराष्ट्रासाठी कलंक आहे. आरोपी हा बलात्काराच्या व्यसनाचा सवयीचा गुन्हेगार असून, गेल्या १५ वर्षांपासून त्याच्यावर हेच आरोप आहेत. नसरापूरमधील नातेवाईक व आप्तांनी त्याला बहिष्कृत केले असतानाही तो पुन्हा पुन्हा निर्दोष सुटून गुन्हे करतो.

**मुख्य मागण्या :** पोलीस तपास निपक्षपाती व कर्तव्यदक्ष भावने त्वरित पूर्ण करून सर्व पुरावे गोळा करून आरोपपत्र न्यायालयात दाखल करावे.,या गुन्ह्यासाठी विशेष फास्ट ट्रॅक कोर्ट नेमून सहा महिन्यांच्या आत चौकशी, साक्ष पुरावा व युक्तिवाद पूर्ण करून आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा द्यावी,न्यायालयीन लढ्यासाठी सर्वोत्तम, प्रामाणिक व न्यायप्रिय वकील म्हणून उज्वल निकम यांची नेमणूक करावी., आरोपीला जामीन मिळू नये यासाठी तपास यंत्रणेला आदेशित करावे.

ही घटना अतिशय गंभीर व दुर्मिळातील दुर्मिळ असल्याचे नमूद करून, निवेदनात म्हटले आहे की, जोपर्यंत अशा सराईत गुन्हेगाराला मरेपर्यंत फाशी होणार नाही, तोपर्यंत निष्पाप बळी व समाजाला न्याय मिळणार नाही. महाराष्ट्राची सामाजिक संवेदना अजून बोथट झालेली नाही.डॉ. संतोष देशपांड अँड. कालिदास देशपांडे,यशवंत आणदुरकर,अँड. संजय पांडे,सचिन कुलकर्णी,राजेश पंडितराव देशपांडे,शिरीण रामकरण पोफळे,सचिन विनायक देशमुख,शुभम राजकुमार कुलकर्णी,संजय निलेगावकर, बाळासाहेब देशपांडे, नगर-सेवक प्रवीण कस्तुरे, प्रकाश बोधनकर,माधव वामनराव देशपांडे, लक्ष्मीकांत कुलकर्णी,ऋषिकेश अशोकराव उटीकर,भातंब्रेकर भानुदास, देशपांडे चंद्रशेखर शंकरराव, दिवाकर विठ्ठलराव कुलकर्णी, विनोद सुधाकर जपे,वसंत मुंडे, जयंत शास्त्री,किशोर कुलकर्णी,रघुत्तमाचार्य.जोशी, यांच्यासह नरसापुर बालिका अत्याचार व हत्या निषेध कृती समिती चे सदस्य आणि लातूरकरांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## ट्रॅव्हल्समध्ये चढणाऱ्या महिलेची पर्स चोरली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** शहराच्या बसस्थानकासमोर लातूरहून उदगीरकडे जाण्यासाठी खाजगी ट्रॅव्हल्समध्ये चढताना गर्दीचा फायदा घेऊन एका शिक्षिकेच्या पर्समधील छोटी पर्स चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.५) सकाळी ७वाजेच्या सुमारास घडली. त्या पर्समध्ये महिलेचे एक तोळा ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने होते. याप्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.



पुणे-मुंबईहून उदगीर, नांदेडकडे जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स पहाटेपासूनच लातूरमध्ये येण्यास सुरुवात होते. बहुतेक प्रवासी लातूरमध्येच उतरत असल्याने पुढे जाणाऱ्या ट्रॅव्हल्समध्ये जास्त गर्दी नसते.

त्यासाठी उदगीरकडे जाणाऱ्या प्रवाशांना कमी पैशात नेण्यात येते. ही चांगली सोय असल्याने लातूरमधील शेकडो चाकरमानी याच ट्रॅव्हल्सने उदगीरला जातात.

मंगळवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास शिक्षिका सुचिता विनोद नारागुडे (रा. सोनखेड ता. अहमदपूर, हा. मु. कर्जत जि. रायगड) या शिक्षिकेला उदगीरला जायचे होते. तेवढ्यात एक खाजगी ट्रॅव्हल्स आली. प्रवाशांची गर्दी असल्याने जागा धरण्यासाठी त्या लगबगीने बसमध्ये चढत होत्या. त्या गर्दीचा डाव साधून अज्ञात चोरट्याने सुचिता नारागुडे यांच्या बगगलेतील मोठ्या पर्सची चैन उघडली. त्या पर्समध्ये आत ठेवलेली छोटी पर्स अलगद काढून घेतली. त्या पर्समध्ये सुचिता नारागुडे यांचे साडेतीन ग्रॅमची सोन्याची रिंग, दोन ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या अंगठ्या व अर्धा ग्रॅम वजनाच्या नाकातील सातदाणे असे एकूण १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने होते. ते घेऊन अज्ञात चोरट्याने पोबारा केला. याप्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांच्या नेतृत्वात अंमलदार व्ही. बी. पंडगे करीत आहेत.

## कारची रिक्षाला धडक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ७ मे :** समोरील वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या नादात भरधाव वेगात कार चालवून समोरून येणाऱ्या प्रवासी रिक्षाला जोराची धडक देऊन दोघांना गंभीर जखमी करण्यासह रिक्षाचेही नुकसान केल्याची घटना निलंगा तालुक्यातील तळीखेड पाटीजवळ दि. १७ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी सोमवारी (दि.४) कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

अग्रलेख...

# भाजपाचे यश आणि जबाबदारी

पश्चिम बंगालचे राजकारण जरा वेगळे आहे. या राज्यात भाजपा कधीही सत्तेत येऊ शकत नाही. ममता दीदी हा करिश्मा असलेल्या नेत्या आहेत, असा दावा करणाऱ्या कथित राजकीय तज्ज्ञांना ताज्या विधानसभा निकालांनी चांगलीच चपराक बसली आहे. आसाममध्ये स्वबळावर आणि पुडुचेरीत मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाने तिसऱ्यांदा विजयी पताका फडकावली आहे. पाचपैकी तीन राज्यांमधील निकाल भाजपाच्या बाजूने लागले आहेत. त्यामुळे २०१४ पासून राष्ट्रीय राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय विचारांचा अश्वमेध आता ब्रह्मपुत्रेच्या तीरावर जाऊन पोहोचला आहे. या विजयामुळे भाजपाला बंगालमध्ये पाय घट्ट रोवण्याची संधी मिळाली आहे. पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दुर्दम्य राजकीय इच्छाशक्ती आणि अजोड रणनीती यामुळे ही विजयश्री खेचून आणणे भाजपाला जमले. माणसे असोत की पक्ष असोत, त्यांचे यश मोठे होते, तेव्हा त्यांच्या जबाबदाऱ्याही वाढतात. भारताच्या ७० टक्क्यांहून अधिक भूभागावर सत्ताधीश झालेल्या भाजपाचीही जबाबदारी या निकालांनी आणि त्यातही पश्चिम बंगालच्या यशाने अधिक वाढविली आहे. भाजपाची सत्ता असलेल्या सर्व राज्यांमध्ये सबळ नेतृत्व देऊन तेथील जनतेच्या अपेक्षांवर या पक्षाला आता खरे उतरावे लागणार आहे. या राज्यांमधील सत्ता टिकवून ठेवण्यासाठी तेथील कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन राष्ट्रीय विचारांचा अग्नी तेवत ठेवावा लागणार आहे.

पश्चिम बंगालमध्ये दीर्घकाळ टिकलेले राजकीय समीकरण ताज्या निकालांनी पूर्णपणे बदलून टाकले. पहिल्यांदाच या राज्यात भाजपाने स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळविले व सत्ता हस्तगत केली आहे. मागील १५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला त्या तुलनेत फार यश मिळाले नाही. या पराभवामुळे ममता बॅनर्जी यांच्या दीर्घकालीन राजकीय वर्चस्वाला धक्का बसला आहे. भाजपाच्या या यशाला किमान एका दशकाची पृष्ठभूमी आहे. २०१४ मध्ये केंद्रात सत्ता आल्यानंतर भाजपाने सातत्याने या राज्यात संघटन वाढविण्यावर भर दिला. टप्प्याटप्प्याने मतांची टक्केवारी वाढवत पक्षाने तेथील पकड मजबूत केली. पश्चिम बंगालमधील भाजपाची पाळेमुळे रोवली जाण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात तृणमूल काँग्रेसचीच भूमिका महत्त्वाची होती. १९९८ मध्ये भाजपाने पहिल्यांदाच दमदम लोकसभा मतदारसंघातून विजय मिळविला होता. त्यावेळी तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांची आघाडी होती. भाजपाचे तपन सिकदर यांनी विजय मिळवित पक्षासाठी पश्चिम बंगालच्या सत्ताकारणाचे दार उघडले होते. १९९९ मध्येही त्यांनी विजय मिळविला आणि पुढे अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये मंत्रिपद भूषविले होते. त्या एका जागेपासून सुरू झालेला भाजपाचा प्रवास आज विधानसभेच्या २०७ जागांपर्यंत पोहोचला आहे. सद्यस्थितीत प. बंगालमधील ४२ लोकसभा मतदारसंघांपैकी १२ खासदार भाजपाचे आहेत. तृणमूल काँग्रेसचे २९ आणि काँग्रेसचा एक खासदार आहे. दोन वर्षांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकीतील ही कामगिरी लक्षात घेतली तर भाजपाचा विजय नेत्रदीपक ठरतो आणि त्यामागे रणनीतीचे व राष्ट्रीय व राज्यस्तरीय मुद्यांचे फार महत्त्व आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या राज्यातील महिला, युवक, शासकीय कर्मचारी यांच्यासह सर्वांना आश्वासक आणि सुरक्षित वातावरण गेल्या कित्येक दशकांत मिळालेले नव्हते. ते आपल्याला भाजपाच्या सत्ताकाळात मिळू शकते, असा विश्वास या मतदानातून व्यक्त झाला. केंद्र सरकारकडून देशभरात सुरू असलेला विकास आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा या दोन्ही मुद्यांवर मध्यमवर्गीय आणि प्रथमच मतदान करणाऱ्या तरुण मतदारांना आकर्षित करण्यात भाजपाला यश आले. पश्चिम बंगालच्या निवडणुकीत कायदा-सुव्यवस्था आणि सुरक्षा हा तर फारच मोठा मुद्दा होता. कम्युनिस्टांचा दहशतवाद पॅटर्न ममता बॅनर्जी पुढे चालवित होत्या. भाजपाने निर्भय वातावरणाची हमी दिली आणि मतदारांना ते भावले. निवडणुकीदरम्यान केंद्रीय दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती मतदारांना निर्भय करणारी ठरली. याशिवाय, मतदारयाद्यांचे मोठ्या प्रमाणात शुद्धिकरण झाल्यामुळे पात्र व भारतीय मतदारांनाच मतदानाची संधी मिळाली हाही मुद्दा आहेच. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम भाजपाच्या बाजूने झाला.

आसामच्या राजकारणात पुन्हा एकदा हिमंता बिस्वा सरमा यांचीच छाप उमटली. या निवडणुकीत भाजपाने पूर्णपणे सरमा यांच्या नेतृत्वावर भर दिला. तेथेही घुसखोरीचा मुद्दा होताच. केवळ मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून नव्हे तर रणनीतीकार आणि मुख्य प्रचारक म्हणूनही सरमा यांनी आघाडी घेतली. त्यांनी राज्यभर केलेले प्रचंड दौरे, शेकडो सभा आणि थेट व आक्रमक संवादशैली यामुळे मतदारांपर्यंत पक्षाचा संदेश प्रभावीपणे पोहोचला. स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करीत त्यांनी प्रचाराला धार दिली आणि त्याचा थेट फायदा भाजपाला झाला. सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळविणे कोणत्याही पक्षासाठी मोठे आव्हान असते. सामान्यतः दीर्घकाळ सत्तेत असलेल्या पक्षाविरुद्ध किंवा नेत्याविरुद्ध जनतेत नाराजी निर्माण होते. मात्र, सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने हा 'अँटी इन्कम्बन्सी'चा अडथळा यशस्वीपणे पार केला. प्रचारादरम्यान काही वादग्रस्त मुद्यांनीही वातावरण तापवले होते. काँग्रेस नेते पवन खेरा यांनी सरमा यांच्या पत्नीबाबत केलेल्या आरोपांमुळे मोठी खळबळ उडाली होती. या आरोपांचा योग्य राजकीय वापर करीत भाजपाने वातावरण निर्मिती केली व योग्य रणनीतीच्या माध्यमातून निवडणूक जिंकली. पुडुचेरीमध्ये एनडीएला एकूण ३० सदस्यांच्या सभागृहात १८ जागा मिळाल्या आहेत. इंडिया आघाडीला फक्त ६ जागा मिळाल्या तर अपक्ष उमेदवारांनी ३ जागा जिंकल्या. दोन्ही मतदारसंघांत विजय मिळविणारे रंगासामी हे विक्रमी पाचव्यांदा मुख्यमंत्री होण्याच्या तयारीत आहेत. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची धुरा सांभाळली तेव्हा गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान यासह सात राज्यांमध्ये भाजपाची सत्ता होती. त्यातील दोन राज्यांमधील सत्ता मित्रपक्षांच्या बळावर होती. काँग्रेसची एकूण १३ राज्यांत सत्ता होती. तेव्हापासून सुरू झालेला भाजपाचा विजयरथ अविरत एकापाठोपाठ एक यश संपादन करीत दौडत निघाला आहे. आज महत्त्वाच्या अशा महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेशसह भाजपाची आणि भाजपाप्रणित एनडीए सरकारांची संख्या २० च्या घरात जाते. एवढ्या मोठ्या भूभागावर भाजपाचा ध्वज अभिमानाने फडकत आहे. त्यातही पश्चिम बंगालमधील विजय भाजपाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. बांगलादेशाची सीमा लागून असल्याने आणि बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न देशभरात अतिशय गंभीर होत असल्याने या विजयाला राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अपार महत्त्व आहे. यशासोबत जबाबदारी वाढतेच. तशी ती भाजपाची वाढली आहे. केंद्रात भाजपाचे सरकार आहे आणि भारताच्या सत्तर टक्के भूभागावरील राज्येही भाजपाच्या सत्तेअंतर्गत आहेत. लोकांच्या अपेक्षा स्वाभाविकच वाढतील. किंबहुना, त्या वाढलेल्या अपेक्षाच मतपेटीतून भाजपाला मिळालेल्या कौलाच्या स्वरुपात यापूर्वी आणि यावेळी देखील व्यक्त झाल्या हे समजून घेतले पाहिजे. सुशासन, सुरक्षितता, सौहार्दासह पारदर्शी सरकारी यंत्रणा, निर्भय व्यवस्था, गतिमान प्रशासन, उत्तम शिक्षण-आरोग्यसेवेच्या संधी, पेयजल-सिंचन व शेती, रोजगार व उद्योग-उद्यम अशा विविध आघाड्यांवर भाजपाच्या सर्व सरकारांना काम करावे लागेल. पश्चिम बंगालच्या मतदारांनी दिलेला कौल हा ऐतिहासिक यासाठी आहे की, तिथे पठडी नाकारून भाजपाला विजय मिळाला आहे. स्वाभाविकच तेथील जनतेच्या अपेक्षा असणार. इतर राज्यांतही भाजपाच्या सत्ताधाऱ्यांकडून जनतेला अपेक्षा आहेतच. अशी आव्हाने पेलण्यातच राजकीय पक्ष व नेत्यांचे खरे कसब असते. भाजपामध्ये अंगभूत कसब असलेले अनेक नेते आहेत. प्रत्येक राज्याची काही जुनी दुखणी आहेत. ती या नेत्यांच्या माध्यमातून हटवावी लागतील. निर्भयतेचे वातावरण सर्वत्र निर्माण करावे लागेल. योग्य व्यक्तींना योग्य ठिकाणी वापर करीत गतिमान व कल्याणकारी प्रशासनाची गाडी वेगाने हाकली गेली तर देशाच्या कानाकोपऱ्यातील लोक भाजपाला सत्तेची माळ घालण्यास तयार आहेत, याची हमी देणारा हा निकाल आहे.


विशेष

## शहरी परिवहन कात टाकतेय

**प्रा. सुखदेव बखळे**

सध्या देशातील मेट्रो आणि प्रादेशिक जलद परिवहन प्रणाली (आरआरटीएस) नेटवर्कची एकूण लांबी एक हजार किलोमीटरपेक्षा अधिक झाली असून हे नेटवर्क २४ शहरांमध्ये कार्यरत आहे. २०१४ मध्ये ही लांबी केवळ २४८ किलोमीटर होती. यावरून या क्षेत्रात झपाट्याने झालेली प्रगती स्पष्ट होते. दिल्ली मेट्रो हे सुमारे ३५० किलोमीटर लांबीचे सर्वात मोठे जाळे आहे तर बंगळुरू मेट्रोनेही ७५ किलोमीटरचा टप्पा ओलांडला आहे. देशभरात दररोज सुमारे २.८ दशलक्ष प्रवासी या सेवांचा वापर करतात. याशिवाय, जवळपास ९७० किलोमीटर लांबीचे नवीन प्रकल्प सध्या विविध शहरांमध्ये बांधकामाधीन आहेत. त्यात दिल्ली-मेरठ 'आरआरटीएस कॉरिडॉर'चा समावेश आहे. या क्षेत्राच्या विस्तारात केंद्र सरकारचा वाढता पाठिंबा निर्णायक ठरला आहे. २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मेट्रो प्रकल्पांसाठी ३४८.०७ अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली असून २०१३-१४ च्या तुलनेत ही रक्कम सहापट अधिक आहे. याशिवाय आशियाई विकास बँक, जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था, 'युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक' आणि 'केएफटी' यासारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडूनही महत्त्वपूर्ण निधी मिळत आहे. शहरी परिवहनात केवळ विस्तारच नव्हे, तर नव्या तंत्रज्ञानावर आधारित पर्यायांचाही उदय होत आहे. दिल्ली-मेरठ दरम्यान विकसित होत असलेला 'नमो भारत आरआरटीएस कॉरिडॉर' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या प्रकल्पातील गाड्या १६० किलोमीटर प्रतितास वेगाने धावू शकतात आणि सध्या सुमारे ५५ किलोमीटर मार्गावर सेवा सुरू आहे.

दरम्यान, केरळमधील कोची येथे देशातील पहिला 'वॉटर मेट्रो' प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाद्वारे ७८ किलोमीटर मार्गावर १० बेटांना इलेक्ट्रिक-हायब्रिड बोटींद्वारे जोडण्याचा उद्देश आहे. या उपक्रमाच्या यशानंतर देशातील २४ शहरांमध्ये जलआधारित परिवहनाच्या शक्यता तपासण्यासाठी तांत्रिक अभ्यासांना मंजुरी देण्यात आली. पर्यावरणीय शाश्वततेच्या दृष्टीनेही मेट्रो प्रकल्प महत्त्वाची पावले उचलत आहेत. सप्टेंबर २०२४ मध्ये 'एनसीआरटीसी'ने कमी दरात हरित ऊर्जा मिळविण्यासाठी 'पॉवर ट्रेडिंग कॉर्पोरेशन'सोबत करार केला. तसेच फेब्रुवारी २०२५ मध्ये ओखला विहार मेट्रो स्थानकावर द्विमुखी सौर ऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला. तो दोन्ही बाजूंनी सूर्यप्रकाश शोषून ऊर्जा निर्माण करतो. ऊर्जा कार्यक्षमतेसाठी पुनरुत्पादक ब्रेकिंग (रिजनरेटिव्ह ब्रेकिंग) तंत्रज्ञानाचाही वापर वाढत आहे. दिल्ली मेट्रोच्या 'ब्लू लाईन'ला कार्बन-न्यूट्रल प्रमाणपत्र मिळणे ही या क्षेत्रातील प्रगतीची नोंद घेण्यासारखी बाब आहे. शिवाय इलेक्ट्रिक बस सेवेला चालना देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. 'पीएम-ई-बस सेवा' योजनेंतर्गत १० हजार ई-बस तैनात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ऑगस्ट २०२५ पर्यंत सुमारे ७३०० बस मंजूर झाल्या असून त्यापैकी ६५१८ बससाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच, 'पीएम इलेक्ट्रिक ड्राईव्ह रिव्हॉल्युशन' योजनेंतर्गत चार दशलक्षांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ९ शहरांमध्ये १४ हजारांहून अधिक ई-बसना प्रोत्साहन दिले जाणार आहे. अनेक राज्यांनीही ई-बसचा वापर वाढविण्यासाठी स्वतंत्र धोरणे आखली आहेत. भारतातील मेट्रो रेल क्षेत्र केवळ विस्तारापुरते मर्यादित न राहता तांत्रिक प्रगती, स्वदेशीकरण आणि प्रवासी-केंद्रित सुधारणांच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. वाढती मागणी, शहरांमधील नेटवर्क विस्तार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार यामुळे या क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडत आहेत. मेट्रो नेटवर्कच्या विस्तारासोबतच रोलिंग स्टॉक (गाड्या आणि संबंधित उपकरणे) या क्षेत्रातही सकारात्मक प्रगती दिसून येते. विशेषतः चालकविरहित गाड्यांचा वापर वेगाने वाढत आहे. दिल्ली मेट्रोच्या मॅजेंटा लाईनवर संपूर्णपणे अनअटेंडेड ट्रेन ऑपरेशन्स (युटीओ) सुरू झाले असून पिंक लाईनवर ही प्रणाली लागू केली जात आहे. यासोबतच 'मेक इन इंडिया'च्या धोरणांतर्गत रोलिंग स्टॉकचे स्वदेशी उत्पादन वाढविण्यावर भर दिला जात आहे. बंगळुरू मेट्रोच्या 'यलो लाईन'ला १०० टक्के स्वदेशी बनावटीची चालकविरहित ट्रेन मिळाली. ती 'टिटागढ रेल सिस्टिम्स'ने तयार केली आहे. तसेच, 'अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड'ने दिल्ली मेट्रोच्या फेज चारसाठी 'मेट्रोपोलिस' प्रकारातील पहिली गाडी वितरित केली आहे. या गाड्या आंध्र प्रदेशमधील श्रीसिटी येथील प्रकल्पात तयार करण्यात आल्या असून 'ग्रेड ऑफ ऑटोमेशन ४' म्हणजे पूर्णपणे चालकविरहित तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. सहा डब्यांच्या एकूण ५२ गाड्या टप्प्याटप्प्याने दिल्लीत दाखल होणार आहेत.



तिकीट व्यवस्था आणि भाडे संकलन प्रक्रियेत डिजिटल परिवर्तन दिसून येते. दिल्ली, कोलकाता आणि मुंबई मेट्रोच्या काही मार्गांवर क्यूआर कोड आधारित तिकीट प्रणाली सुरू करण्यात आली आहे. दिल्ली मेट्रोचे तिकीट आता उबर आणि रॅपिडोसारख्या कॅब ॲप्सवरूनही बुक करता येते. याशिवाय, 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) प्रणालीशी सुसंगतता वाढविण्यात येत आहे. मुंबई मेट्रोच्या 'ॲक्वा लाईन'वर आणि आग्रा मेट्रोवर ही सुविधा सुरू करण्यात आली. सिग्नलिंग आणि कम्युनिकेशन क्षेत्रातही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) प्रणालीमुळे माहितीचे अचूक आणि वेळेवर आदानप्रदान शक्य होते. मुंबई मेट्रोच्या ॲक्वा लाईनवर 'अरबॅलिस फॉरवर्ड' हे अत्याधुनिक 'सीबीटीसी' तंत्रज्ञान वापरले जात आहे. तसेच कानपूर मेट्रोच्या विस्तारित मार्गावरही स्वयंचलित ट्रेन ऑपरेशनसाठी 'सीबीटीसी' प्रणाली लागू करण्यात आली आहे. प्रवासी सुरक्षितता आणि सोयीसुविधा वाढविण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपाययोजना राबविण्यात येत आहेत. प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्समुळे अपघातांची शक्यता कमी झाली आहे. सर्व स्थानकांवर मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित निगराणी प्रणालींचा वापर वाढत आहे. 'बंगळुरू मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'ने सहा स्थानकांवर 'एआय-सक्षम सीसीटीव्ही' प्रणाली सुरू केली. या प्रणालीमुळे रिअल-टाईममध्ये धोके ओळखणे, संशयास्पद हालचालींचा मागोवा घेणे आणि वाहनांच्या नंबर प्लेटची ओळख पटविणे शक्य झाले आहे. मेट्रो सेवेमध्ये ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प, टॅक्टाईल टाईल्स, ऑडिओ-व्हिज्युअल घोषणा यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी'वर विशेष भर दिला जात आहे. फीडर बस, टॅक्सी, ऑटोरिक्षा आणि इलेक्ट्रिक वाहनांशी मेट्रोचे जाळे जोडले जात आहे. हैदराबाद मेट्रोसाठी 'ईव्हीझीप'ने इलेक्ट्रिक कार आणि महिला चालवत असलेल्या इलेक्ट्रिक दुचाकी सेवा सुरू केल्या. पुणे मेट्रोने 'टीएस स्वीच ई-राईड प्रा. लि.'सोबत ई-बाईक सेवेसाठी करार केला असून पहिल्या टप्प्यात १० स्थानकांवर ही सुविधा उपलब्ध होणार आहे तसेच 'एनसीआरटीसी' आणि दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन यांनी न्यू अशोकनगर आणि आनंद विहार या 'नमो भारत' स्थानकांना जोडण्यासाठी वातानुकूलित इलेक्ट्रिक बस सेवा सुरू केली आहे. मेट्रो रेल प्रणाली भारतातील शहरी परिवहनाचा कणा बनत आहे. नेटवर्कचा विस्तार, ऊर्जा कार्यक्षमतेवर दिला जाणारा भर, डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि प्रवासी अनुभव सुधारण्यासाठी घेतलेले उपक्रम यामुळे या क्षेत्राने उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

वेध

## बच्चू कडूंचा शिवसेनेतील प्रवेशाचा अन्वयार्थ

**गिरीश शेरेकर**



अचलपूर मतदारसंघ भाजपाला दिल्यामुळे नाराज झालेल्या बच्चू कडू यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेतून बाहेर पडत प्रहार संघटनेची व पुढे याच नावाने पक्षाची स्थापना केली. गेल्या २५ वर्षांपासून ते प्रहारच्या नावावर राजकारण करीत आहेत. त्यातील २० वर्षे ते आमदार होते. आगळ्यावेगळ्या आंदोलनातून संघर्ष करीत उदयास आलेले नेतृत्व म्हणजे बच्चू कडू! गोरगरीब, वंचित आणि शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करणारा नेता म्हणून त्यांनी राज्यभरात एक वेगळी ओळख निर्माण झाली. नेहमी एल्गारच पुकारायचा का, या प्रश्नाचे उत्तर शोधत असतानाच त्यांना उद्धव ठाकरे यांनी आपल्या सरकारमध्ये येण्याचे निमंत्रण दिले. बच्चू यांनी ते हसतखेळत स्वीकारले. उद्धव यांना संख्याबळाची फारशी गरज नसताना त्यांनी बच्चूंना राज्यमंत्री करण्याचा जो निर्णय त्यावेळी घेतला होता, त्यावर अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले होते. उद्धव यांचा तो निर्णय किती चुकीचा होता, हे एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीचे समर्थन करत गुवाहाटीला गेलेल्या बच्चू कडू यांनी सिद्ध केले. जनतेतल्या त्यांच्या प्रतिष्ठेला बसलेला हा सर्वात मोठा पहिला धक्का होता. तेव्हापासूनच त्यांची पडझड खऱ्या अर्थाने सुरू झाली. उद्धव यांच्या भरलेल्या ताटावरून उठलेल्या बच्चू यांना शिंदे सरकारमध्ये मंत्रिपदापासून वंचित राहावे लागले. आदळआपट केल्यावर दिव्यांग विभागाचे राज्यमंत्री दर्जाचे अध्यक्षपद देऊन त्यांची बोळवण करण्यात आली. काही दिवस ते त्यात खुश राहिले. पुढे विधानसभा निवडणुका आल्या. महायुतीच्या जागा वाटपात अचलपूर मतदारसंघ एकनाथ शिंदे यांना कडू यांच्यासाठी राखीव ठेवता आला नाही. परिणामस्वरूप कडू यांनी स्वतंत्र चूल मांडली. प्रहारच्या झेंड्याखाली तिसरी आघाडी स्थापन करून ते स्वत: अचलपुरात उभे राहिले आणि अनेक मतदारसंघात त्यांनी उमेदवारही उभे केले. तेही आणि त्यांचे उमेदवारही पडले. तेव्हापासून त्यांनी आपल्या पूर्वीच्या धोरणानुसार संघर्षाची धार तीव्र केली. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार शेतकरी कर्जमाफी केली जाईल, हे वारंवार सरकारने सांगितल्यावरही बच्चू कडू यांनी ती आताच करा, असा हट्ट करीत आंदोलन केले. या आंदोलनासाठी त्यांना कोणी प्रवृत्त केले, याची चर्चाही तेव्हा खूपच रंगली. कर्जमाफीचे श्रेय ते शिंदे आणि स्वत:कडेच ठेवतात, हे महत्त्वाचे!

बच्चू यांचा राजकीय डीएनए सामान्य नागरिकांच्या नेत्याचा आहे. पण, तो बदलविण्याचा प्रयत्न ते सातत्याने करीत आहेत. राजकारणात कमी बोलणे फायद्याचे आणि जास्त बोलणे नेहमी अडचणीचे ठरत असते. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, गोरगरीब, वंचित हे त्यांचे जिव्हाळ्याचे शब्द आहेत. ते या शब्दांचा आधार घेऊन जेव्हा मोठे तत्त्वज्ञान सांगतात, तेव्हा त्यांना त्यांनी मारलेल्या राजकीय कोलांटउड्यांचा विसर पडतो. मुळात बच्चू हे स्वयंभू नेते असले तरी मर्यादा असतातच; वाटेल तसे कुठेही बोलण्याची सवय त्यांना आमदार प्रवीण तायडे व त्यांच्या बंधूंनी समोर आणलेल्या 'क्लिप'मध्ये अडकवून गेली. माझ्यावर जनतेनेच नेत्यांकडे जाण्याची वेळ आणली आणि निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीमुळेच मला शिंदेंच्या शिवसेनेत जावे लागल्याचे ते छाती ठोकून सांगतात. बच्चू शिवसेनेत गेल्याने आपले मूळ अस्तित्व गमावून बसतील, याची पूर्ण शाश्वती त्यांच्या चाहत्यांना आहे. त्यांची ही भीती रास्त आहे. आता कितीही म्हटले तरी बच्चू यांना पूर्वी सारखे उठसूट कोणत्याही विषयावर बोलण्याचे स्वातंत्र्य राहणार नाही. राज्यात सत्तेत असलेल्या शिवसेनेचे ते आमदार होणार आहे. बोलताना त्यांना परवानगी घेऊनच बोलावे लागेल. सवयी प्रमाणे त्यांना बोलण्याचा मोह आवरता आला नाही तर एकनाथ शिंदे यांची निश्चितच अडचण होईल. बच्चू यांनी शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्धार बोलून दाखविला आहे. त्यासाठी विदर्भात शिवसेनेचे संघटन मजबूत करावे लागेल. याच उद्देशाने त्यांना घेण्यात आल्याचे सांगण्यात येते. तो उद्देश कितपत यशस्वी होईल, हे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, राज्यमंत्री संजय राठोड, आशिष जयस्वाल तसेच आनंदराव अडसूळ, अभिजित अडसूळ, जगदीश गुप्ता, ज्ञानेश्वर धाने पाटील, प्रीती बंड यांच्यासह राज्यातले व विदर्भातले अन्य नेते, प्रमुख कार्यकर्ते वेळ आल्यावर सांगणारच आहे. विदर्भच काय अमरावती जिल्हा भाजपावरही त्यांच्या शिवसेना प्रवेशाचा परिणाम होणार नाही; झालाच तर तो अचलपूरपर्यंत मर्यादित राहील.

९४२०७२१२२५

धर्म-संस्कृती

## सप्त ऋषी

**प्रा. दिलीप जोशी**

सप्त मालिकेत आज आपण सप्त ऋषी संदर्भात चर्चा करू. सप्तर्षी हा अनेक पैलू आणि दृष्टीने, कालानुरूप आणि ऋषी अधिकारानुरूप अभ्यासण्याचा विषय आहे. ऋषयो मंत्रद्रष्टार:! ऋषी मंत्रद्रष्टे होते. त्यांना दिव्यशक्ती प्राप्त असे. स्वयं भगवान शिवांनी त्यांना योगशास्त्र ज्ञान दिलेले असल्याने ते द्रष्टे म्हणून सर्वज्ञात आहेत. जोतिष, आयुर्वेद, विविध शास्त्र, नीतिशास्त्र, ज्ञानविज्ञान, शस्त्र-अस्त्र यांचा त्यांना अभ्यास असे. वेदानुसार-

भद्रं इच्छन्त ऋषयः स्वर्विदः, तपो दीक्षां उपनिशेदुरग्रे ।
ततो राष्ट्रं बलम् ओजश्च जातम्, तदस्मै देवा उप संनमन्तु ॥


ऋषींच्या तपोबलानेच राष्ट्र बलसंपन्न होते. त्यात सप्तर्षी म्हणजे ब्रह्मदेवाचे मानसिक पुत्र म्हणून सप्त ऋषींचे स्थान आहे. बृहदारण्यक उपनिषदात सात ऋषी म्हणजे समाजपुरुषाचे ज्ञानेंद्रिये आहेत. ज्यात दोन कान म्हणजे गौतम आणि भारद्वाज ऋषी, डोळे विश्वामित्र आणि जमदग्नी ऋषी, नाकपुड्या वशिष्ठ आणि कश्यप ऋषी तर जीभ अत्री ऋषी आहेत.

अधिकारानुसार ऋषींचे सात प्रकार सांगितले आहेत. १) वशिष्ठादी ऋषी म्हणजे ब्रह्मर्षी, २) नारदादी ऋषी देवर्षी, ३) वाल्मीकादी ऋषी महर्षी, ४) विश्वामित्रादी ऋषी राजर्षी, ५) भेलादी ऋषी परमर्षी, ६) जेमिनी आदि ऋषी काण्डर्षी, ७) सुश्रुतादी ऋषी श्रुतर्षी. असा त्यांचा अधिकार असे. कालानुरूप प्रत्येक मन्वंतरानुसार सप्त ऋषी वेगवेगळे आहेत. सर्वांत प्रथम स्वायंभुव मन्वंतर त्यावेळी सप्तर्षीमध्ये पुलस्त्य, पूलह, क्रतु, मरीची, अंगिरस, अत्री आणि वशिष्ठ हे ऋषी होते. त्यानंतर स्वरोचिष मन्वंतर, उत्तम मन्वंतर, तमस मन्वंतर, रैवत मन्वंतर, चाक्षूष मन्वंतरे झालीत. त्यांचेही मन्वंतरानुसार सप्तर्षी होते. आता पुढे सावर्णि, दक्षसावर्णि, धर्म सावर्णि, ब्रह्म सावर्णि, रुद्र सावर्णि, देव सावर्णि, इंद्र सावर्णि ही मन्वंतरे येणार आहेत. या प्रत्येक मन्वंतरात वेगवेगळे सप्तर्षी राहतील.

सध्या वैवस्वत मन्वंतर सुरू आहे. जे वैवस्वती सप्तर्षी आहेत ते म्हणजे कश्यप ऋषी, अत्री ऋषी, वशिष्ठ ऋषी, विश्वामित्र ऋषी, गौतम ऋषी, जमदग्नी ऋषी, भारद्वाज ऋषी आहेत. आकाशात नभोमंडळीय सप्तर्षींच्या तारका रोज आपण पाहतो.

**कश्यप ऋषी** : ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असलेले कश्यप ऋषी जीवसृष्टीचे मूळ पुरुष म्हणजे आद्य जनक मानले जातात. ज्यांचे गोत्र म्हणजे मूळ पुरुष माहीत नाही, त्यांचे गोत्र कश्यप समजावे. लौकिकार्थाने कश्यप ऋषी मरीची ऋषी आणि कर्दम ऋषींची कन्या कला यांचे पुत्र. कश्यपांचा विवाह प्रजापती दक्ष यांच्या तेरा कन्यांशी झाला. त्यांच्यापासून देव, दानव, नाग, मनुष्य इत्यादी कुळे निर्माण झालीत. कश्यप ऋषींनी सरोवर स्वरूप असलेल्या भूभागाला सपाट करून वसवलेला भूभाग म्हणजे काश्मीर. काश्मीरचे निर्माते कश्यप ऋषी सप्त ऋषीतील एक आहेत. सप्तर्षीतील दुसरे ऋषी म्हणजे अत्री ऋषी. सत्व, रज, तम या तीन गुणत्रयांतीत असलेले अत्री ऋषी आणि त्यांची पत्नी अनसूया साक्षात दत्तात्रेयाचे माता-पिता आहेत. सप्तर्षीमधील पुढील ऋषी म्हणजे वशिष्ठ आहेत. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असलेले वशिष्ठ मित्र आणि वरुण यांच्या सिद्धीतून जन्माला आले म्हणून त्यांना मैत्रावरुण म्हणतात. वशिष्ठ हा शब्द वसू शब्दाचा तमभाव आहे. वसू म्हणजे संपन्न. वशिष्ठ ऋषी ऐश्वर्यसंपन्न होते, कारण त्यांच्याजवळ नंदिनी नावाची कामधेनू होती. ते ज्ञानसंपन्न होते. त्यांची धर्मसूत्रे, वशिष्ठ कल्प, योग वशिष्ठ ही ज्ञानसंपदा प्रसिद्ध आहे. त्यांची पत्नी अरुंधती देखील पतिव्रता स्त्री होती. वशिष्ठ ऋषी रघुवंशाचे कुलगुरू होते. प्रात:स्मरणीय असलेले वशिष्ठ ऋषी सप्तर्षीतील एक आहेत. पुढील ऋषी आहेत ऋषी विश्वामित्र. प्रचंड तेजस्वी, महाप्रतापी विश्वामित्र हे पूर्वाश्रमीचे गाधी यांचे पुत्र राजा कौशिक होते. आपल्या तप:सामर्थ्याने ते ऋषी झालेत. राजा कौशिक यांचा वशिष्ठ ऋषींच्या आश्रमातील नंदिनी नावाची कामधेनू बळकावण्याचा प्रयत्न असफल झाल्यावर राजा कौशिकांना समजले की आत्मिक बळ महत्त्वाचे म्हणून त्यांनी भगवान शिवाची आराधना केली आणि राजा कौशिक पुढे ऋषी विश्वामित्र झालेत.

गायत्री मंत्राचे उद्गाते विश्वामित्र ऋषी असून भगवान रामचंद्रांना अस्त्र आणि शस्त्र विद्या त्यांनीच दिली आहे. त्रिशंकूच्या निमित्ताने प्रतिसृष्टी निर्माण करणारे विश्वामित्र ऋषीच आहेत. पुढील ऋषी आहेत गौतम ऋषी. अंगिरस वंशातील अंध असलेल्या दीर्घतमस ऋषींचे ते पुत्र. गाईच्या सेवेमुळे ऋषी अंधतमस यांना डोळे आले आणि त्यांच्या जीवनातील तमस म्हणजे अंधार नाहीसा झाला म्हणून त्यांनी पुत्राचे नाव गौतम ठेवले. चुकून झालेले गोहत्येचे पातक दूर करण्यासाठी त्यांनी त्र्यंबक क्षेत्री तपश्चर्या करून साक्षात गंगा गोदावरीच्या रूपाने ब्रह्मगिरी त्र्यंबकेश्वर येथे आणली. गोदावरी दक्षिण गंगा गौतमी म्हणूनही ओळखली जाते. गोदावरी गंगेला त्यांनी कुश नावाच्या गवताने



बंदिस्त केलेल्या एका कुंडात आणले तेच कुंड आता कुशावर्त तीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांच्या पत्नीचे नाव अहिल्या होते. त्यांच्या शापामुळे ती शिळा बनली होती. भगवान रामचंद्रांच्या स्पर्शाने ती शिळा मुक्त झाल्याची कथा सर्वांना माहीत आहे. अहिल्या शिळा राघवे मुक्त केली, पदी लागता दिव्य होवोनी गेली. सप्तर्षीतील पुढील ऋषी आहेत जमदग्नी ऋषी. जमदग्नी ऋषींचे नाव सर्वांनाच माहीत आहे. एखादा क्रोधी मनुष्य असेल तर त्याला आपण जमदग्नीचा अवतार म्हणतो. ऋषी जमदग्नी भृगु वंशात जन्माला आलेले. भृगूंचा लत्थाप्रहार खुद्द भगवंतांना सहन करावा लागला होता. ऋषी ऋचिक यांचे पुत्र असलेले जमदग्नी गोरक्षेचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या पत्नीचे नाव रेणुका. माहूरगडावरील रेणुकामाता याच आहेत. भगवान परशुराम जमदग्नी आणि रेणुका यांचे पुत्र. जमदग्नी ऋषींच्या आश्रमात कामधेनू होती. कार्तवीर्य अर्जुनाने याच कामधेनूसाठी जमदग्नी ऋषींशी संघर्ष केला आणि बेसावध असताना जमदग्नीचा वध केला. त्यामुळेच भगवान परशुरामांनी कार्तवीर्य अर्जुन आणि त्यांच्या पुत्रांचा वध तर केलाच; शिवाय तब्बल २१ वेळा पृथ्वीवरील दुष्ट राजांचा नि:पात केला.

यातील पुढील ऋषी ऋषी विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालणारे प्रथम द्रष्टे ऋषी आहेत. वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ, आयुर्वेद, चिकित्साशास्त्र, धनुर्वेद, अर्थशास्त्र, राजनीतिशास्त्र, विमानविद्या अशा अनेक विषयांचे ते तज्ज्ञ होते. ज्या प्रसंगातून वाल्मीकि रामायण लिहिले गेले त्या क्रौंच पक्ष्याचा प्रसंग महर्षी वाल्मीकिंच्या जीवनात घडला तेव्हा भारद्वाज त्यांच्या सोबत शिष्य म्हणून होते. भारद्वाजांचा आश्रम प्रयाग येथे त्रिवेणी संगमावर होता. वनवासात जाताना भगवान राम त्यांच्या आश्रमात थांबले होते. ऋग्वेदाचे सहावे मंडल ऋषी भारद्वाज यांच्या नावे आहे. भारद्वाज शिक्षा, भारद्वाज श्रौतसूत्र त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. ब्रह्मदेव, बृहस्पती, इंद्र यांच्यानंतरचे चौथे वैय्याकरणी म्हणून भारद्वाज आहेत.

हिंदू धर्मग्रंथात सप्तर्षींचे स्थान अनन्यसाधारण असून आपण सर्व याच सप्त ऋषींपैकी एकाचे वंशज गोत्रज आहोत. सध्याच्या वैवस्वत मन्वंतरातील सप्तर्षींचा परिचय सर्वांना व्हावा म्हणून हा प्रामाणिक प्रपंच.

९८२२२६२७३५

## पश्चिम बंगालमध्ये लोकशाहीचा विजय

नुकत्याच झालेल्या पाच राज्यातील निवडणुकांचा निकाल जाहीर झाला. पश्चिम बंगाल, आसाम, पुडुचेरी या तीन राज्यांत विजय मिळवून भाजपाने आपला वरचष्मा पुन्हा एकदा सिद्ध करून भगवा फडकावला. यामागे अनेक कारणे आहेत. आज हा विजय साजरा करताना डोळ्यांसमोर उभे राहतात ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी! ज्यांनी बंगालच्या अखंडतेसाठी प्राणांची आहुती दिली. त्यांच्याच कार्याचे, समर्पणाचे, त्यागाचे फळ आणि सत्तांतराचे संकेत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला धक्का देत भाजपाच्या भगवामय विजयाने मिळाले. या राज्यात डॉ. हेडगेवारांचे वैद्यकीय शिक्षण झाले होते. कितीतरी दशकापासून समर्पित कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना, परिश्रमानंतर मिळालेला विजय हा या महान विभूतींना आदरांजली असेल. भारत एक विकसित राष्ट्र बनण्याच्या दृष्टीने प्रगतीवर आहे. बंगालमधील निवडणूक प्रचारादरम्यान झारग्राम येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रस्त्यावरील एका दुकानात थांबून चटपटीत झालमुडी खाल्ल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. एका सामान्य झालमुडी विक्रेत्यासोबत देशाच्या पंतप्रधानांनी संवाद साधणे ही असामान्य घटना बंगालच्या मतदारांना भावली.

१९०५ मध्ये भारताचा पूर्व बंगाल वेगळा झाला, त्या भूमीचा आवाज पुनश्च पश्चिम बंगालमध्ये एकत्र येण्यासाठी दुर्गा पूजेच्या निमित्ताने ऐकू येईल. बंगालमधील हा विजय म्हणजे केवळ एका निवडणुकीचा निकाल नाही, तर गेल्या कित्येक दशकांपासून भारतमातेच्या सेवेसाठी आपले तन-मन-धन समर्पित करणाऱ्या हजारो स्वयंसेवकांच्या रक्ताने आणि घामाने लिहिलेला देदीप्यमान इतिहास आहे. बंगालच्या सुजाण जनतेने ममता दीदींच्या ज्या सत्तांध कार्यशैलीला नाकारले, त्यामागे अनेक संतापजनक कारणे होती. एका बाजूला ढोंगी धर्मनिरपेक्षता आणि दुसऱ्या बाजूला प्रखर हिंदुद्वेष अशा कात्रीत बंगाल अडकला होता. ममता बॅनर्जी यांची अरेरावी आणि आक्रस्ताळी वृत्ती मोडीत काढणे देशहितासाठी अनिवार्य झाले होते. राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाच्या राज्यातील भारतीय जनता पक्षाचा अभूतपूर्व विजय हा एका राजकीय पक्षाचा, त्याच्या शीर्षस्थ नेतृत्वाचाच विजय म्हणता येणार नाही तर संपूर्ण भारत राष्ट्राचा विजय आहे. यावरून लक्षात येते की, चांगले सरकार निवडून येण्यासाठी देशाचे मतदार जागृत असणे गरजेचे आहे. पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात आजचा दिवस एक महत्त्वाचा टप्पा म्हणून नोंदविला जाईल. कारण पश्चिम बंगालच्या राजकारणात महापरिवर्तनाचे वारे आता वाहिले असून निकालांनी नवा इतिहास घडवला आहे. २०२६ ची निवडणूक ही बंगालच्या सामाजिक सुरक्षिततेची आणि प्रशासकीय पारदर्शकतेची खरी परीक्षा ठरली आहे. संपूर्ण देशाचे लक्ष बंगालच्या निवडणुकीकडे होते. ममता दीदींची ११ वर्षांची कारकीर्द उलटून पाडणे सोपी नव्हते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मुसद्दीपणा, अमित शाहांचे १५ दिवस बंगालला वास्तव्य, स्वयंसेवकांचे कष्ट, अनेक लोकांचे सहकार्य यामुळे हे यश लाभले तसेच बंगालच्या जनतेने लोकशाहीच्या ताकदीवर या अन्यायाचा पाढा वाचला आहे. हा विजय बंगालच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरेल. अराजकता संपवून सुशासनाची पहाट घडवून आणणाऱ्या बंगालच्या क्रांतिकारी जनतेचे मनःपूर्वक अभिनंदन!

**अमोल राजपूत**/पुणे

वाचक पत्रे

**(याच विषयावर अनेक वाचकांची पत्रे मिळाली असून त्यात संजय श्रौती, डॉ. मदन मनोहरराव काकडे, वंदना नवघरे, अमोल तपासे, रवी वाघमारे, शशिकांत पांडे, वीरेंद्र सोनवणे, अविनाश देशपांडे, श्याम ठाणेदार, निर्मला गांधी, प्रा. श्रीकांत पांडे, श्रीकांत काशीकर आदींचा समावेश आहे.)**

### वीटभट्टी कामगारांची अग्निपरीक्षा!

पारा ४४ अंशांवर, १० ते १२ तास सलग काम; मूलभूत सुविधांचाही अभाव; आरोग्याचा प्रश्न गंभीर. वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या महिला कामगारांची स्थिती गंभीर बनली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या स्थलांतरित कामगारांपर्यंत शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे पोहोचत नसल्याने त्यांच्या आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि उपजीविकेच्या समस्या अधिकच तीव्र होत आहेत. वीटभट्ट्यांवरील महिलांचा दिवस पहाटे ३ ते ४ वाजता सुरू होतो. माती तुडवणे, विटांचे साचे तयार करणे, ओल्या विटा चाळत घालणे आणि वाळलेल्या विटा भट्टीत रचणे अशी कष्टाची कामे त्यांना सलग १० ते १२ तास करावी लागतात. सलग वाकून काम करणे, डोक्यावरून विटांचे ओझे वाहणे आणि चूल-धुराच्या संपर्कामुळे महिलांना पाठदुखी, कंबरदुखी, त्वचारोग तसेच श्वसनाचे विकार उद्भवत आहेत. बहुतांश ठिकाणी स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि सुरक्षित निवासाची सुविधा नसते. विशेषतः गर्भवती महिलांनाही शेवटपर्यंत जड काम करावे लागत असल्याची बाब चिंताजनक आहे. भट्टीतून निघणारा धूर व धूळ श्वसनमार्गात गेल्याने दम्याचे व इतर फुफ्फुसांचे आजार वाढत आहेत. मात्र वेळेवर वैद्यकीय सुविधा न मिळाल्याने या समस्या अधिकच गंभीर बनत आहेत.

**नितीन दुर्बुडे**/पथ्रोट, ९५०३६४८६३०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# परळीत धक्कादायक घटना: उपचारात अक्षम्य हलगर्जीपणा !; गर्भातील बाळाचा मृत्यू, तब्बल 22 तास मृत भ्रुण ठेवले पोटात; डॉक्टरांविरोधात तक्रार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | शहरातील एका खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांच्या उपचारातील हलगर्जीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. त्याचबरोबर या हृदयद्रावक घटनेनंतरही गांभीर्य न घेता केवळ अर्थिक लाभ उठविण्याच्या उद्देशाने या गरोदर मातेच्या पोटात तब्बल २२ तास मृत भ्रुण ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या डॉक्टरच्या हलगर्जीने बाळ तर दगावलेच पण त्यानंतर या बाळाच्या मातेची प्रचंड हेळसांड करुन तिच्याही जीवाशी खेळ केल्याचा अमानवी व वैद्यकीय क्षेत्राला डाग लावणारा गंभीर लज्जास्पद प्रकार या डॉक्टरांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टरां विरोधात शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून कर्तव्यात कसूर, बाळाच्या मरणास कारणीभूत व मातेच्या जीवाशी खेळण्याच्या अघोरी प्रकाराची सखोल चौकशी करून कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी मागणी करण्यात आली आहे.

या हृदय पिळवटून टाकणाऱ्या व धक्कादायक प्रकारानंतर वैजनाथ संभाजी मुंडे यांनी पोलीसांत धाव घेऊन गित्ते हॉस्पीटलच्या डॉ. कल्पना सचिन गित्ते यांच्याविरुद्ध कायदेशीर तक्रार दाखल केली आहे.तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या पत्नीवर गेल्या काही महिन्यांपासून संबंधित डॉक्टरांकडे उपचार सुरू होते. 23 एप्रिल रोजी अचानक पोटदुखीचा त्रास सुरू झाल्यानंतर त्यांनी डॉक्टरांशी संपर्क साधला. डॉक्टरांनी तातडीने दवाखान्यात येण्यास सांगितले. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतरही योग्य वेळी तपासणी व उपचार करण्यात आले नाहीत. तसेच, सोनोग्राफीसाठी बाहेरील केंद्रावर पाठविण्यात आले. तेथे झालेल्या तपासणीनंतर गर्भातील बाळाची स्थिती गंभीर असल्याचे सांगण्यात आले. तरीही रुग्णालयात वेळेत आवश्यक वैद्यकीय निर्णय न घेता विलंब करण्यात आला. दरम्यान, उपचाराच्या नावाखाली वारंवार पैसे मागण्यात आले.प्रचंड अर्थिक शोषण करण्यात आले.

डॉक्टरांच्या अक्षम्य दुर्लक्ष व हलगर्जीमुळे गर्भातील बाळाचा मृत्यू तर झालाच परंतु गरोदर मातेच्या जीवाशीही खेळण्याचा प्रकार या डॉक्टरांनी केला. मृत बाळ पोटात असतांना ते काढण्यासाठीची प्रसुती प्रक्रिया करण्यासाठी तब्बल २२ तास लावले ही अतिशय गंभीर बाब असुन या मातेच्या जीवाशीच खेळण्याचा प्रकार केवळ अर्थिक फायदा उचलण्यासाठी करण्यात आलेला आहे. या घटनेमुळे तक्रारदार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या संपूर्ण प्रकरणात संबंधित डॉक्टरांनी निष्काळजीपणा करून रुग्णाच्या जीवाशी खेळ केल्याचा आरोप करत, दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. तसेच, या प्रकरणाची वैद्यकीय व कायदेशीर चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणीही करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाने तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली असून पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले आहे.

जिल्हा शल्य चिकित्सकांकडेही न्यायाची मागणी

दरम्यान, या धक्कादायक व अमानवी कृत्याची चौकशी करावी व वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली आर्थिक शोषण, मानसिक त्रास आणि नागरिकांच्या जीवाशी होणारा खेळ थांबवावा अशी मागणी करण्यात आली आहे. अतिशय गंभीर असा हा प्रकार पवित्र समजल्या जाणाऱ्या वैद्यकीय क्षेत्राला डाग लावणारा आहे.यापुर्वीही सोनपेठ तालुक्यातील एका महिलेच्या बाबतीतही याच डॉक्टरांनी असाच प्रकार केल्याचे समोर आले आहे.केवळ अर्थिक लाभ उठविण्यासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार वारंवार घडत असुन याबाबत वैजनाथ संभाजी मुंडे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांची भेट घेऊन तक्रार दाखल केली आहे.या प्रकरणी आता सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## कुलरमध्ये पाणी भरताना विजेच्या धक्याने 26 वर्षीय तरुणाचा मृत्यू



**अंबाजोगाई** | अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथे मंगळवारी सकाळी घडलेल्या दुर्दैवी घटनेत कुलरमध्ये पाणी भरताना विजेचा धक्का लागून 26 वर्षीय नजीर खदीर सय्यद यांचा मृत्यू झाला. सकाळी साडेआठच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

प्राप्त माहितीनुसार, नजीर सय्यद हे रोजच्या प्रमाणे कामावर जाण्याच्या तयारीत होते. यावेळी घरातील लोखंडी कुलरमध्ये पाणी टाकत असताना अचानक कुलरमध्ये विद्युत प्रवाह उतरला. जोरदार धक्का बसताच ते जागीच कोसळले. घरच्यांनी तत्काळ वीजपुरवठा बंद करून त्यांना रुमच्या बाहेर काढत स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या नजीर यांच्या अकाली निधनाने सय्यद कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, आठ महिन्यांची चिमुकली मुलगी आणि वृद्ध आई – वडील असा परिवार आहे. कुटुंबाचा एकमेव कमावता हात गेल्याने त्यांच्या पुढे उपजीविकेचे मोठे संकट उभे ठाकले आहे.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विद्युत उपकरणे वापरताना विशेष काळजी घ्यावी, विशेषतः कुलरमध्ये पाणी भरताना वीजपुरवठा पूर्णपणे बंद असल्याची खात्री करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# पळवून नेलेल्या दोन अल्पवयीन चुलत बहिणींची सुखरूप सुटका; आरोपी उत्तर प्रदेशातून अटकेत

बीड -- जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील उमापूर येथून दोन अल्पवयीन सख्या चुलत बहिणींना 5 एप्रिल 2026 रोजी पळवून नेल्याची घटना घडली होती. या घटनेने जिल्ह्यात खळबळ माजली होती. या प्रकरणी चकलांबा पोलिस ठाण्यात कलम 137(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गंभीर प्रकरणाचा तपास करताना आरोपी विजय महादेव कव्हळे (रा. पळशी, ता. मुदखेड, जि. नांदेड) याने मुलींना अज्ञात कारणासाठी पळवून नेल्याचे समोर आले. पोलिसांसमोर आरोपीसह मुलींचा शोध घेणे हे मोठे आव्हान होते.

तांत्रिक तपासाने दिला मोठा धागा




तपासादरम्यान आरोपी पूर्वी भिवंडी (जि. ठाणे) येथे काम करत असल्याची माहिती मिळाली. परंतु तेथे शोध घेतला असता आरोपी व मुली सापडल्या नाहीत. त्यानंतर तांत्रिक विश्लेषणाद्वारे मुली बिहार-उत्तर प्रदेश सीमाभागात असल्याचे स्पष्ट झाले.

उत्तर प्रदेशात धाडसी कारवाई

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार चकलांबा पोलिसांचे विशेष पथक उत्तर प्रदेशात रवाना झाले. बलीया जिल्ह्यातील शिवपुर दियार येथे शोध घेतल्यानंतर आरोपी सिकंदरपुर येथे असल्याची माहिती मिळाली.

स्थानिक पोलिसांच्या मदतीने केलेल्या संयुक्त कारवाईत: आरोपी विजय कव्हळे याला अटक करण्यात आली, दोन्ही अल्पवयीन मुलींची सुखरूप सुटका करण्यात आली, महत्त्वाची बाब म्हणजे आरोपी मुलींना पुढील काही दिवसांत छत्तीसगड येथे घेऊन जाण्याच्या तयारीत होता. मात्र त्याआधीच पोलिसांनी मोठी कारवाई करत हा कट उधळून लावला.

४ दिवसांच्या सलग प्रवासानंतर यश

चकलांबा पोलिसांच्या पथकाने सलग चार दिवस प्रवास करून ही मोहीम यशस्वी केली. या कामगिरीत खालील अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले: पोलीस अधीक्षक: नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक: सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी: अनिल कटके, तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, कल्याण पवार, हनुमान इंगोले आणि टेक्निकल ॲनालिसिस सेलचे शेखर औटे व विकी सुरवसे यांनी ही कारवाई पार पाडली.

## भाजपच्या वतीने आनंद उत्सव तसेच बदाम आबा पंडित यांचा वाढदिवस साजरा



पश्चिम बंगाल, आसाम आणि पुडूचेरी येथे भाजप ची बहुमताने सत्ता आली. त्यानिमित्ताने जिल्हा भाजपच्या वतीने आनंद उत्सव साजरा केला आणि माजी मंत्री मा. बदाम आबा पंडित यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. या प्रसंगी माजी मंत्री मा. बदाम आबा पंडित,जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख, ॲड. सर्जेराव तात्या तांदळे, माधव तात्या निर्मळ,युवा नेते योगेश भैय्या क्षीरसागर, नवनाथ आण्णा शिराळे, शिवराज भैय्या पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## नसरापूर येथील बालिका अत्याचार प्रकरणी आरोपीला मृत्यू दंडाची शिक्षा द्यावी : विनायक रत्नपारखी

**माजलगाव** | पुणे येथील नसरापूर येथे झालेली घटना अतिशय निंदनीय दुर्दैवी व माणुसकीला काळीमा फासणारी आहे त्यामुळे नसरापूर येथील बालिका अत्याचार प्रकरणातील आरोपीस मृत्युदंडाची शिक्षा द्यावी अशी मागणी भाजपा शहर मंडळ माजलगाव तालुका अध्यक्ष तथा परशुराम हिंदू सेवा संघाचे प्रदेश सरचिटणीस विनायक रत्नपारखी यांनी तहसीलरी निवेदन देत टीव्ही मीडियाशी बोलताना केली.

माजलगाव तहसील येथे नसरापूर येथे झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी



ब्राह्मण समाज व इतर समाज बांधव यांच्यातर्फे निवेदन देण्यात आले. 65 वर्षाच्या नराधम व्यक्तीने अत्याचार करून मुलीचा खून केला या निंदनीय घटनेचा तीव्र निषेध संपूर्ण महाराष्ट्रातून होत आहे, आरोपीला शिक्षा होण्यासाठी कायदा व नियम कठोर करून आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा व्हायलाच पाहिजे जेणेकरून येणाऱ्या काळात देखील अशा घटना होणार नाहीत यासाठी आरोपीलां मृत्युदंडाची शिक्षा दिली व कायद्याचा धाक निर्माण झाला पाहिजे जेणेकरून येणाऱ्या काळात असे विकृत कृत्य करताना कुठल्याही व्यक्तीने हजारदा विचार केला पाहिजे. यावेळी नगरसेवक सचिन देशमुख म्हणाले खरे तर आरोपीला फाशीची शिक्षा देणे गरजेचे आहे किंवा एन्काऊंटर केले पाहिजे जेणेकरून पुढील काळात कोणीही अशी प्रत्येक करणार नाही. यावेळी निवेदन देताना दत्ता महाजन कमलेश जाबरस बप्पा देशमुख बी एन कुलकर्णी डॉक्टर शैलेश पाठक सुधीर वैद्य हिमांशू देशमुख महेश खामगावकर किसन पाटील चिंतेश जोशी संतोष काटकर अनिकेत भिलेगावकर सुनील कुलकर्णी भरत जोशी गोपाळ कुलकर्णी उपस्थित होते

## जायकवाडीतून गोदावरी पात्रात तात्काळ पाणी सोडा

### ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांची मागणी

**गेवराई** | चालू वर्षी उन्हाळ्याची तीव्रता प्रचंड वाढली असून एप्रिल अखेर गोदावरी नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडले आहे. याचा मोठा फटका राक्षसभुवन, शहागड आणि नदीकाठच्या गावांना बसत आहे. येथील भीषण पाणीटंचाई लक्षात घेता जायकवाडी धरणातून गोदावरी पात्रात तात्काळ पाणी सोडावे, अशी आग्रही मागणी 'ग्राहक पंचायत महाराष्ट्र'चे जिल्हा उपाध्यक्ष अनिल गोविंदराव बोर्डे यांनी केली आहे. राक्षसभुवन हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, नदीपात्र कोरडे पडल्याने भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध नाही. केवळ भाविकच नव्हे, तर स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे. सर्वात विदारक परिस्थिती मुक्या जनावरांची असून, पाण्यासाठी ती वणवण भटकत आहेत. वेळेत पाणी न मिळाल्यास जनावरे मृत्युमुखी पडण्याची भीती अनिल बोर्डे यांनी व्यक्त केली आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे नदीकाठच्या भागातील जलस्त्रोत पूर्णपणे आटले असून विहिरी आणि कूपनलिकांच्या पाणीपातळीत मोठी घट झाली आहे. यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. या नैसर्गिक आपत्तीत प्रशासनाने बघ्याची भूमिका न घेता युद्धपातळीवर हालचाली करणे गरजेचे आहे, असे बोर्डे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## तुलसी कनिष्ठ महाविद्यालयाचा ९७.१४% निकाल; तिन्ही शाखांत यशाची परंपरा कायम

बीड (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत बीड येथील तुलसी कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

महाविद्यालयाचा एकूण निकाल ९२.५३% लागला असून, विज्ञान शाखेने ९७.१४% निकालासह घवघवीत यश संपादन केले आहे. तसेच कला शाखेचा निकाल ८०.००% आणि वाणिज्य शाखेचा ६६.६६% लागला असून, तिन्ही शाखांमधील विद्यार्थ्यांमध्ये गुणांची मोठी चुरस पाहायला मिळाली.

यामध्ये विज्ञान शाखेत आर्यन कोरडे याने प्रथम क्रमांक पटकावला, तर सम्यक इनकर व प्राची पगारे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेतून साक्षी गायकवाड आणि कला शाखेतून मयुरी नावाडकर यांनी महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रकाश ढोकणे, तसेच प्रा. सीमा पवार, प्रा. प्रकाश गायकवाड, प्रा. हनुमंत विद्यागर, प्रा. निलेश जाधव, प्रा. गणेश काळे आणि श्री. महेश उड्डाण यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जुना वादातून केजच्या सुर्डी फाटा येथे भरदिवसा हत्या; आरोपीला तासाभरात बेड्या!

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील सुर्डी फाटा येथे जुन्या वादातून एका व्यक्तीची लाकडी काठीने मारहाण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना ५ मे रोजी दुपारी घडली. खुशालराम बलभीम ठोंबरे (रा. सुर्डी) असे मृताचे नाव असून, याप्रकरणी युसूफ वडगाव पोलिसांनी वेगाने चक्रे फिरवत आरोपीला अवघ्या एका तासात बेड्या ठोकल्या आहेत. कौटुंबिक वादाचा राग मनात धरून ही हत्या करण्यात आल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत खुशालराम ठोंबरे हे मंगळवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास सुर्डी फाटा येथील एका वडापावच्या दुकानात बसलेले होते. यावेळी आरोपी मंगेश भारत माने याने कुटुंबाला केलेल्या शिवीगाळीचा आणि जुन्या वादाचा राग मनात धरून खुशालराम यांच्यावर लाकडी



काठीने हल्ला चढवला. या भीषण मारहाणीत गंभीर जखमी झाल्याने खुशालराम यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेनंतर मृताचा मुलगा बालाजी खुशालराम ठोंबरे यांनी युसूफ वडगाव पोलीस ठाण्यात समक्ष हजर होऊन फिर्याद दिली. या फिर्यादीवरून आरोपी मंगेश भारत माने (वय २९ वर्ष, रा. सुर्डी) याच्याविरुद्ध युसूफ वडगाव पोलीस ठाण्यात गु. र. क्र. १२४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होताच युसूफ वडगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी तपासाची चक्रे फिरवली. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी कुंभेफळ परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तातडीने या परिसरात पाठलाग करून गुन्हा नोंद झाल्यापासून अवघ्या एका तासाच्या आत आरोपी मंगेश माने

## जन शिक्षण संस्थान बीड द्वारा धारूर येथे कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न

### प्रशिक्षण घेऊन प्रत्येकाने स्वावलंबी व्हावे'- संचालक गंगाधर जी देशमुख यांचे आवाहन

**बीड** | कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (भारत सरकार) अंतर्गत जन शिक्षण संस्थान, बीडच्या वतीने वैद्यनाथ नगर, धारूर येथे कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या प्रसंगी जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री. गंगाधर देशमुख आणि प्रबंध समिती सदस्य श्री. दादासाहेब कराड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशिक्षणातून उद्योजक घडावेत



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री. गंगाधर देशमुख म्हणाले की, "केवळ प्रशिक्षण घेऊन थांबू नका, तर त्यातून स्वावलंबी बना. प्रत्येक प्रशिक्षणातील किमान दहा व्यक्तींनी तरी स्वतःचा उद्योग, व्यवसाय सुरू केला पाहिजे. उद्योगासाठी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या माध्यमातून ३५% सबसिडीसह कर्ज उपलब्ध होऊ शकते. महिलांनी या संधीचा लाभ घेऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे," असे आवाहन त्यांनी केले.

कामगारांच्या कष्टावरच ही पृथ्वी उभी दादासाहेब कराड

प्रबंध समिती सदस्य श्री. दादासाहेब कराड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गिरणी कामगारांच्या लढ्याचा इतिहास मांडला. ते म्हणाले, "मुंबई महाराष्ट्रात राहण्यासाठी सामान्य कामगारांनी मोठा संघर्ष केला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अंबाजोगाईत जनप्रबोधनपर भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन

### आयोजक राजेश इंगोले यांची माहिती

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त त्यांनी सांगितलेल्या मौलिक विचारांचे मूल्यांचे प्रकटीकरण करणारा जनप्रबोधनपर क्रांतिकारी भीमगीतांचा जलसा अंबाजोगाई येथे साठेनगर, परळी वेस येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले व न्यूज लोकमनचे संपादक संजय जोगदंड यांनी यावेळी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सदरील कार्यक्रम बुधवार, दिनांक 6 मे 2026 रोजी साठेनगर, मांडवा रोड, परळी वेस, अंबाजोगाई येथे संध्याकाळी 6.30 वाजता संपन्न होणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून लोककला लोकगीते आणि कलाकारांद्वारे प्रदर्शित करण्यात येणारी कला यांना सन्मान दिला होता. व्याख्यात्याचे दोन तासांचे भाषण आणि कलाकाराचे पाच मिनिटांचे गाणे हे एकाच ताकदीचे असतात असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या काळात म्हटले होते. अंबाजोगाई येथील स्थानिक कलाकारांचा हा ताफा भीमगीतांचा क्रांतिकारी जलसा आपल्यासमोर गाण्यांच्या स्वरूपात गाऊन दाखविणार आहेत. अंबाजोगाईतील अनेक कलाकार महाराष्ट्रातल्या विविध भागात जाऊन त्यांची कला सादर करीत असतात असा नांवलौकिक असणारे हे कलाकार त्यांना अंबाजोगाई मध्ये हा कला मंच गेल्या अनेक वर्षांपासून न्यूज लोकमनच्या वतीने आम्ही उपलब्ध करून दिला आहे अशी माहिती आयोजक राजेश इंगोले यांनी यावेळी प्रसिद्धी माध्यमांना दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ राजेश इंगोले यांच्यासह न्यूज लोकमनचे संपादक संजय जोगदंड, महादेव माने, विकास एडके, तुकाराम सुवर्णकार, गणेश काळे प्रयत्न करीत आहेत. या कार्यक्रमासाठी अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध गायक कलावंत राजकुमार ठोके, बळीराम उपाडे, गौतम सरवदे, सुभाष शेप, राजाभाऊ इंगळे, शिरसाट, विकास एडके, महादेव माने, राहुल सुरवसे, आसाराम जोशी, प्रदीप चोपने, अमोल तरकसे, नारायण साठे, महेश गीते, वशिष्ठ काचगुंडे, स्विथम इंगळे, रफिक शेख यांच्यासह सुप्रसिद्ध गायिका विद्या बनसोडे, मयुरी मजगे, क्रांती एडके, रोहिणी गायकवाड व धनश्री यादव हे भीमगीतांचा नजराना सर्व रसिक प्रेक्षकांसमोर पेश करणार आहेत. तरी अंबाजोगाई परिसरातील आंबेडकरवादी आंबेडकर प्रेमी जनतेने या जनप्रबोधनपर क्रांतिकारी भीमगीतांच्या जलशासाठी उपस्थित राहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करण्यासाठी हजर राहावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नरसापूर घटनेचा भूममध्ये निषेध; कठोर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.६ मे -**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नरसापूर येथे अल्पवयीन बालिकेवरील अत्याचार व हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ जनशक्ती नगर विकास आघाडी, भूम यांच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला निवेदन देत आरोपीवर कठोर



कारवाई करून प्रकरणाचा जलद व निष्पक्ष तपास करावा, तसेच फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून पीडितेला तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी केली. हे निवेदन उपविभागीय अधिकारी, भूम यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष लक्ष्मी साठे, अनिल शेंडगे, सुनीता वीर, शमशाद मुजावर, नुरजहां मनीयार, चंद्रकला पवार, विठ्ठल बागडे, नवनाथ रोकडे, रामराजे कुंभार, चंद्रमणी गायकवाड यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आरोपीस कठोर शिक्षा देऊन पीडितेला न्याय द्यावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त...



### लोकसेवा हायस्कूल गिरवलीला धाराशिव जिल्ह्यात दुसरा क्रमांक

**भूम, दि.६ मे -**

'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' या उपक्रमात लोकसेवा हायस्कूल, गिरवलीने पहिल्याच टप्प्यात जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावत दोन लाख रुपयांचे बक्षीस मिळवले. या यशाबद्दल पंचायत समिती भूमचे गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांनी शाळेचे मुख्याध्यापक हरिदास डोके व शिक्षक दस्तगिर पठाण यांचा सत्कार करून सन्मान केला.



### नसरापूर येथील घटनेचा निषेध; नळदुर्गमध्ये मोर्चा

**नळदुर्ग, दि.६ मे -**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर (ता. भोर) येथे ४ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून हत्या केल्याच्या संतापजनक घटनेच्या निषेधार्थ नळदुर्ग शहरात ५ मे रोजी सायंकाळी लोकमान्य वाचनालय ते पोलिस ठाण्यापर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला. या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत नागरिकांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांना निवेदन देऊन आरोपीला कठोर शिक्षा, फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून पीडितेला तातडीने न्याय देण्याची मागणी केली. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कडक कारवाईची मागणी करण्यात आली. मोर्चात महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जोपर्यंत आरोपीला फाशीची शिक्षा होत नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहील, असा इशारा आंदोलकांनी दिला.



### प्रभाकर हाके यांना 'सैनिक रत्न' पुरस्कार; भूममध्ये सत्कार

**भूम, दि.६ मे -**

भूम तालुक्यातील माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष मेजर प्रभाकर पांडुरंग हाके यांची 'सैनिक रत्न' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. या निमित्ताने माजी नगराध्यक्ष विकासरत्न संजय गाढवे यांच्या हस्ते साहिल कॉम्प्लेक्स येथे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक अभिजीत शेटे, सुनील थोरात यांसह मान्यवर उपस्थित होते. लष्करी सेवेसह समाजकार्यातील योगदानाची दखल घेऊन हाके यांना हा सन्मान देण्यात येत आहे. हाके हे निवृत्तीनंतरही समाजसेवेत सक्रिय असून सध्या सैनिक फेडरेशनचे भूम तालुका सचिव म्हणून कार्यरत आहेत. माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या अडचणी सोडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. तसेच जिल्हा संरक्षण समितीचे सदस्य म्हणून ते सैनिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहेत.



### भाजपच्या विजयाचा भुममध्ये जल्लोष

**भूम, दि.६ मे -**

पश्चिम बंगालसह तीन राज्यांमध्ये भाजपाला सत्ता स्थापनेसाठी मिळालेल्या यशाचा आनंद तालुका भाजपच्या वतीने शहरातील गोलाई चौकात साजरा करण्यात आला. घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या कार्यक्रमास भाजपा राज्य परिषद सदस्य बाळासाहेब क्षीरसागर, तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर, जिल्हा उपाध्यक्ष महादेव वडेकर, रघुनाथ वाघमोडे, बिभीषण पवार, बाबासाहेब वीर, आबासाहेब मस्कर, स्वाती तनपुरे, तसेच मुकुंद वाघमारे, निलेश शेळके, महादेव शेंडगे, राम वारे, शंकर खामकर, चंद्रकांत गवळी, हेमंत देशमुख, बंडू लोंढे, सुब्राव शिंदे, संदीप खामकर, बाबुराव साळुंखे, सोमनाथ वारे, श्रीपाद देशमुख, सिद्धार्थ जाधव, शांतिराज बोराडे, सुरेश उपरे, शिवाजी वनवे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### राजर्षी शाहू महाराज स्मृतीदिन साजरा

**धाराशिव, दि.६ मे -**

सामाजिक न्याय, समता व प्रगतिशील विचारांचे अधिष्ठाता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा स्मृतीदिन ६ मे रोजी धाराशिवमध्ये श्रद्धापूर्वक पाळण्यात आला. शहरातील शाहू महाराज चौकात त्यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बलराज रणदिवे, पंकज भोसले, सुनील आंबेकर, रोहित पडवळ, खलील, कुणाल निंबाळकर, मोहन मुंडे, नरसिंह मिटकरी, आकाश मुंडे यांसह मान्यवर उपस्थित होते.

## वन्यजीव धोक्यात; येरमाळा वनपरिसरातील वनविभागाचा हलगर्जीपणा?

### ५० हजार रोपांपैकी निम्मी जळाली...

**सुधीर लोमटे**
**येरमाळा, दि.६ मे -**



येरमाळा येथील श्री येडेश्वरी मंदिर परिसरालगत सुमारे साडेसहाशे एकर वनक्षेत्र असून येथे मोर, हरिण, काळवीट, वानर यांसह विविध वन्यप्राण्यांचे वास्तव्य आहे. मात्र वनविभागाच्या दुर्लक्षामुळे या परिसरातील वन्यजीव आणि वनसंपत्ती गंभीर धोक्यात आल्याचे वास्तव समोर आले आहे.

वन्यप्राण्यांसाठी या परिसरात आठ पाणवठे निर्माण करण्यात आले होते. परंतु काही पाणवठे गेल्या वर्षभरापासून तुटलेल्या अवस्थेत असून त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. उर्वरित पाणवठे पूर्णपणे कोरडे पडले आहेत. ऑक्टोबरपासून उन्हाळा अर्ध्यावर येऊनही वनविभागाकडून पाण्याची कोणतीही सोय करण्यात आलेली नसल्याने वन्यप्राणी पाण्यासाठी भटकंती करत आहेत. काही प्राणी गावांच्या हद्दीत येऊ लागल्याने मानव-वन्यप्राणी संघर्षाची भीती निर्माण झाली आहे.

दरम्यान, वनविभागाने अलीकडेच सुमारे ५० हजार रोपांची लागवड केली होती. मात्र पाण्याअभावी यापैकी सुमारे ५० टक्के रोपे जळून गेल्याची माहिती समोर आली आहे. तसेच गतवर्षीच्या घनवन प्रकल्पातील दोन ते तीन प्लॉटही वाळण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे लाखो रुपयांचा खर्च वाया गेल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

या सर्व प्रकारामागे वनमजुरांच्या नियोजनाचा अभाव हे मुख्य कारण असल्याचे सांगितले जात आहे. स्थानिक नागरिकांनी वनविभागाच्या निष्काळजी कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत, वन्यजीवांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेली पाण्याची साधी व्यवस्था देखील केली जात नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया दिली.

या पार्श्वभूमीवर वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून पाण्याची व्यवस्था, वनमजुरांची नियुक्ती आणि रोपांचे संरक्षण यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

### पाण्याच्या शोधात वन्यप्राणी गावाकडे...

मलकापूर येथील सिताबाई बाबासाहेब पायाळे ह्या महिला स्वतःच्या अंगणात रात्री झोपल्या असता त्यांच्यावर उद या प्राण्याने त्यांच्यावर हल्ला करून नाकाचा चावा घेऊन त्यांना गंभीर जखमी केले. त्यांच्यावर शासकीय रुग्णालय धाराशिव येथे उपचार करण्यात आले.

## निष्काळजीपणे गॅस वापर; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

बेंबळी परिसरात हातगाडीवरील गॅस शेगडी निष्काळजीपणे वापरल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ओमकार लांडगे व गोरख मारुती लांडगे यांनी ५ मे रोजी सायंकाळच्या सुमारास लासोना रोडलगत जामा मस्जिद शेजारी हातगाडीवरील गॅस शेगडी निष्काळजीपणे पेटवून भा.न्या.सं. कलम २८७ चे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे नोंदवले असून पुढील तपास सुरू आहे.

## भूम नगर परिषदेत राजकीय वाद चिघळला

### १५ नगरसेवकांवर कारवाईची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.६ मे -**

प्रशासकीय कामकाजात सतत अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप करत भूम नगर परिषदेत राजकीय वाद उफाळून आला आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा संयोगिता गाढवे व माजी नगराध्यक्ष संजय गाढवे यांच्यासह आलमप्रभू भूम शहर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांची भेट घेऊन तक्रार सादर केली.



शहरातील विविध विकास कामांबाबत चर्चा करताना, जनशक्ती आघाडीच्या १५ नगरसेवकांकडून नगर परिषदेमधील प्रशासकीय कामकाजात सातत्याने अडथळे निर्माण होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. यामुळे विकासकामे ठप्प होत असून नागरिकांना याचा फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तक्रारीत संबंधित १५ नगरसेवकांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

यावेळी नगराध्यक्षा संयोगिता गाढवे, माजी नगराध्यक्ष संजय गाढवे, नगरसेवक सुरज गाढवे, अभिजीत शेटे, रिमा शिंदे, तौफिक कुरेशी, भाग्यश्री माने आदी उपस्थित होते.

## आष्टा कासार येथे मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

लोहारा तालुक्यातील आष्टा कासार येथे चाकूने हल्ला करून गंभीर मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

कृष्णा मदने, सचिन मदने व सागर मदने (सर्व रा. आष्टा कासार) यांनी २८ एप्रिल रोजी प्रकाश पांढरे यांच्या दुकानासमोर फिर्यादी सुशीलकुमार मल्लीनाथ आळंगे (वय ३६) यांना चुलत भावास मारहाण केल्याचा जाब विचारण्याच्या कारणावरून चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केले.

## लोहारा येथे बाल संस्कार शिबिर उत्साहात संपन्न

### ६० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.६ मे -**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांत संचलित भारतमाता मंदिर प्रकल्प, लोहारा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. २७ एप्रिल ते ०४ मे या कालावधीत बाल संस्कार शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून ७ शिक्षकांनी विविध उपक्रमांद्वारे त्यांना मार्गदर्शन केले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांत संचलित भारतमाता मंदिर प्रकल्प यांचा सहभाग

या शिबिरामध्ये व्यायाम, योगासने, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर, वाचन, प्रश्नमंजुषा, वैदिक गणित, व्यंगचित्र प्रदर्शन, देशभक्तीपर गीत व गोष्टी, मूल्यशिक्षण, कागदापासून वस्तू तयार करण्याची कार्यशाळा, विविध सापांची माहिती, मैदानी खेळ तसेच व्यक्तिमत्व विकास अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. यामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक व मानसिक सर्वांगीण विकास साधण्यावर भर देण्यात आला. यावेळी शंकर जाधव यांनी मार्गदर्शन करताना ५ ते १४ वयोगटातील मुलांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवून योग्य वयात चांगले संस्कार घडविणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी शहाजी जाधव, श्रीनिवास माळी, गणेश हिप्परगेकर, व्यंकटेश पोतदार, दयानंद क्षीरसागर, पवन पवार, पिंटू लोखंडे, बाळू माशाळकर व सुलक्षणा जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

## धाराशिवमध्ये दुचाकीची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**



शहरातील सांजा रोड परिसरातून दुचाकी चोरीची घटना घडली असून याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भैरुनाथ संभाजी काळे (वय ५०, रा. कोर्ट कॉलनी, सांजा रोड) यांची हिरो होंडा स्प्लेंडर (क्र. एमएच -२५ जे ६०१७) ही मोटरसायकल ३ मे रात्री ८ ते ४ मे सकाळी ६ दरम्यान सिटी पॉईंट हॉटेलच्या पाठीमागून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## कन्हेरवाडीतील आई सटवाई देवीची यात्रा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ मे -**

तालुक्यातील कन्हेरवाडी येथे मराठवाड्यात प्रसिद्ध असलेल्या आई सटवाई देवीची यात्रा बुद्ध पौर्णिमेनिमित्त मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.

सकाळी आठ वाजता वाजत-गाजत पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. लेझीम पथक, आराधी मंडळ, पोतराज यांचा सहभाग असून डॉल्बीच्या तालावर ग्रामस्थ नृत्यात रंगले होते. दुपारी पालखीचे आगमन झाल्यानंतर महिलांनी नैवेद्य दाखवण्यासाठी मोठी गर्दी केली.

आई सटवाई देवी हे जागृत देवस्थान मानले जात असून नवस बोलण्यासाठी व फेडण्यासाठी जिल्ह्यासह परजिल्ह्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात. बाळाचे जावळ काढण्याची परंपराही येथे पाळली जाते.

यात्रेनिमित्त सोंगे, कुस्ती स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच विविध मान्यवरांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या वाढदिवसानिमित्त क्रिकेट स्पर्धाही घेण्यात आल्या.

यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी उपसरपंच विजय कवडे, तंटामुक्ती अध्यक्ष कपिल कवडे, संदीप कवडे यांच्यासह युवकांनी पुढाकार घेतला.

## धाराशिवमध्ये इंधन टंचाई; तातडीने उपाययोजना करा : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल टंचाई तीव्र होत असून नागरिक व शेतकरी अडचणीत सापडले आहेत. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी मागणी केली आहे.



काही पेट्रोल पंपांवर कृत्रिम टंचाई निर्माण करून जादा दराने विक्री होत असल्याच्या तक्रारीही पुढे आल्या आहेत. पावसाळ्यापूर्वीच्या शेती कामांवर याचा परिणाम होत आहे. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा विभाग, तहसील प्रशासन व पोलिसांच्या समन्वयातून नियंत्रण यंत्रणा उभारावी, प्रत्येक पंपावर साठा जाहीर करावा व टँकर वितरणावर देखरेख ठेवावी, असे सुचविण्यात आले आहे.



दरम्यान, तेल कंपन्यांकडून अपुरा पुरवठा होत असल्याची तक्रार करत संयुक्त बैठक घेण्याची मागणी करण्यात आली असून, प्रशासन व कंपन्यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवण्यात आले आहे. तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## कवठा पाटी येथे भीषण अपघात; दुचाकीस्वाराचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ मे -**

कवठा शिवारातील कवठा पाटी येथे घडलेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून दुसरा जखमी झाला आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पवन राजेंद्र धायगुडे (वय ३०, रा. सम्राट चौक, लातूर) व त्यांचा मित्र किरण हनुमंत गायकवाड (वय २७, रा. शासकीय कॉलनी, लातूर) हे दि.२८ एप्रिल रोजी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास मोटारसायकलवरून प्रवास करत होते.

दरम्यान, कवठा शिवारातील कवठा पाटी येथे ट्रक (क्र. टीएस ०८ युई ३३३६) चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवत त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात किरण गायकवाड हे गंभीर जखमी झाले असून त्यांचा मृत्यू झाला. तर पवन धायगुडे हे किरकोळ जखमी झाले आहेत.

## लोहाऱ्यात व्यापारी संकुल व शासकीय विश्रामगृह उभारण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.६ मे -**

लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात असलेली पंचायत समितीची जुनी इमारत गेल्या १५ वर्षांपासून वापराविना पडून असून संबंधित जागा जिल्हा परिषद विभागाच्या मालकीची आहे. ही जागा मोकळी पडून असल्याने तिचा योग्य विनियोग करून त्या ठिकाणी ५ मजली अद्ययावत व्यापारी संकुल तसेच सुसज्ज शासकीय विश्रामगृह उभारण्यात यावे, अशी मागणी भाजपा लोहारा तालुक्याच्या वतीने करण्यात आली आहे.



या संदर्भात धाराशिव जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांना निवेदन देण्यात आले.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही विस्तीर्ण जागा लोहाऱ्याचे केंद्रस्थान मानली जाते. येथे बहुमजली प्रशासकीय व व्यापारी इमारत उभारल्यास शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडून बाजारपेठेला आधुनिक स्वरूप प्राप्त होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

लोहारा तालुका स्थापन होऊन ३० वर्षे उलटूनही शहरात अद्याप सुसज्ज शासकीय विश्रामगृह उपलब्ध नसल्याची खंत व्यक्त करत या प्रस्तावित इमारतीत विश्रामगृहाची सोय करण्याची मागणीही करण्यात आली आहे. यामुळे लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची गैरसोय दूर होईल, असे नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर विधानसभा प्रमुख राहुल पाटील, तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, शिवशंकर हतरगे, विक्रांत संगशेट्टी, प्रशांत काळे, हरी लोखंडे, दगडू तिगाडे, प्रमोद पोतदार, सिद्धेश्वर बिडवे, निकेश बचाटे, संपत देवकर, अशोक तिगाडे, मल्लिनाथ फावडे, युवराज जाधव, शिवा बंडगर, विजय दरेकर, राजशेखर माणिकशेट्टी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिंतूर शहरातील पुंगळवेस रस्त्यावर नाले तुंबल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## नगरपालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह, मुख्याधिकारी,नगराध्यक्षांनी लक्ष देण्याची गरज

**परभणी ,/प्रतिनिधी:-** जिंतूर शहरातील पुंगळवेस रस्त्यावर नाले तुंबल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर नागरिकांचे आरोग्य धोक्यात; नगरपालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जिंतूर नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ९ मधील पुंगळवेस रस्त्यावर गेल्या पाच दिवसांपासून नाल्या कचऱ्याने तुंबल्याने परिसरातील नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. नाल्यांमधील पाणी वाहून जाण्यास मार्ग नसल्याने दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट रस्त्यावर साचले असून नागरिकांच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे. या परिसरात हजरत सयदुल कादरी दर्गा, महादेव मंदिर, सार्वजनिक स्मशानभूमीकडे जाणारा मुख्य रस्ता तसेच दोन कब्रस्तानांकडे ये-जा करणाऱ्या नागरिकांची व वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र साचलेल्या घाणीमुळे नागरिकांना नाक दाबून मार्ग काढावा लागत आहे. दुर्गंधी, डासांचे प्रमाण आणि वरह चा मुक्त संचार त्यामुळे अस्वच्छतेमुळे साथीच्या रोगांचा धोका वाढल्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अनेकदा नगर परिषदेकडे तक्रारी करूनही स्वच्छतेबाबत ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगर परिषदेच्या स्वच्छता अभियानाचा केवळ दिखावा होत असून प्रत्यक्षात नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप होत आहे. रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यामुळे वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत असून पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. धार्मिक स्थळांकडे जाणाऱ्या भाविकांनाही या समस्येमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी तात्काळ नालेसफाई करून साचलेले घाण पाणी हटवावे, नियमित स्वच्छता मोहीम राबवावी आणि आरोग्य धोक्यात आणणाऱ्या या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी



जोरदार मागणी नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, वाढत्या अस्वच्छतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असून नगर परिषद प्रशासनाने त्वरित लक्ष न दिल्यास आंदोलनाचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### कुंडी सज्जा येथील तलाठी स्वाती राऊत यांना आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्कार : कर्तव्यदक्षता व जनसेवेच्या उल्लेखनीय कामगिरीची जिल्हास्तरावर दखल

**परभणी,/प्रतिनिधी :** कामातील तत्परता, संवेदनशीलता आणि कर्तव्यदक्षतेची दखल घेत कुंडी सज्जा येथील तलाठी श्रीमती स्वाती राऊत यांना जिल्हास्तरीय 'आदर्श ग्राम महसूल अधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते श्रीमती राऊत यांचा गौरव करण्यात आला. या वेळी अप्पर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह महसूल विभागातील सर्व उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीमती स्वाती राऊत यांनी आपल्या कार्यकाळात सामान्य नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडवण्यावर विशेष भर दिला. तसेच महसूल विभागाच्या विविध योजना तळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला असून, प्रशासकीय वर्तुळासह कुंडी सज्जा परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्या कामाची पावती असून, भविष्यात अधिक जबाबदारीने आणि जनहितार्थ काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे, अशा भावना श्रीमती राऊत यांनी व्यक्त केल्या.

### लॅक्रॉस खेळात महाराष्ट्रातील खेळाडूंना उज्वल संधी : शैलेश लाहोटी : सेलू येथील नूतन विद्यालयात राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा

**सेलू,/प्रतिनिधी :** लॅक्रॉससारखा तुलनेने अपरिचित विदेशी खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी ठरत असून, पारंपरिक खेळांपेक्षा या खेळात महाराष्ट्रातील खेळाडूंना उज्ज्वल भवितव्य आहे. त्यामुळे खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले.

नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू व परभणी जिल्हा लॅक्रॉस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामजी भांगडिया शतकोत्तर रजत जयंती वर्षानिमित्त आयोजित चौथ्या राज्यस्तरीय सीनियर लॅक्रॉस अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हा कार्यक्रम कन्या प्रशालेच्या श्रीमती कमलाबाई आसारामजी बाहेती सभागृहात बुधवारी (दि. ६) पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. एस. एम. लोया होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी दीपक कुमार वाघमारे, नगराध्यक्ष मिलिंद सावंत, राज्याध्यक्ष डॉ. सुमेधा ठाकूर, राज्यचिटणीस डॉ. मोहम्मद बाबर, संस्था सचिव डॉ. विनायकराव कोठेकर, उपनगराध्यक्ष साईराज बोराडे, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, शिक्षण सभापती मिलिंद पवार, माजी जिल्हा परिषद सभापती अशोक काकडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. लॅक्रॉस या खेळ प्रकाराला महाराष्ट्र शासनाकडून नोकरीत ५ टक्के आरक्षणाची मंजुरी मिळाल्याची माहिती यावेळी राज्य सचिव डॉ. मोहम्मद बाबर यांनी यावेळी खेळाडूंना दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनायकराव कोठेकर यांनी केले. सूत्रसंचालन गोपाळ आम्ले यांनी तर आभार प्रदर्शन गणेश माळवे यांनी मानले.

४० संघांनी नोंदवला सहभाग...

या स्पर्धेत राज्यभरातून २६ पुरुष व १४ महिला अशा एकूण ४० संघांनी सहभाग नोंदवला आहे. या स्पर्धेतून महाराष्ट्राचे पुरुष व महिला संघ निवडले जाणार आहेत. पहिल्या दिवशी झालेल्या साखळी फेरीत पुरुष गटात परभणी, धुळे, नागपूर, धाराशिव, नंदुरबार, बीड, कोल्हापूर व जळगाव संघांनी विजय मिळवत बाद फेरीत प्रवेश केला. तर महिला गटात नागपूर, बुलढाणा, गोंदिया, नाशिक व वाशिम संघांनी पुढील फेरी गाठली.

### जिंतूर सेनगाव परिसरात बुद्ध मूर्तींची तोडफोड; आरोपींना अटक न झाल्यास १२ मे रोजी धरणे आंदोलनाचा इशारा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर व सेनगाव तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तींची तोडफोड झाल्याच्या गंभीर घटना समोर आल्या असून, या प्रकरणामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दोषींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा १२ मे २०२६ रोजी धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

सेनगाव तालुक्यातील मौजे वाढोना येथील तक्षशिला बौद्ध विहारात उभी असलेली सुमारे १५ फुटांची भगवान बुद्धांची मूर्ती अज्ञात समाजकंटकांनी फोडून तिच्या काही भागास जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना ४ मे रोजी सकाळी उघडकीस आली. विहाराचे प्रमुख भंतेजी बुद्धकिर्ती हे त्या वेळी मुंबई येथे धम्मकार्याकरिता गेले होते. उपासक सकाळी वंदनेसाठी विहारात गेले असता हा प्रकार समोर आला.याचप्रमाणे जिंतूर तालुक्यातील मौजे रायखेडा येथे नागतीर्थ गंधकुटी भैसजे बुद्ध विहारातील भगवान गौतम बुद्धांची मूर्ती ९ एप्रिल २०२६ रोजी तोडण्यात आली होती. या दोन्ही घटनांप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले असून, तपास सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, अद्याप आरोपींना अटक न झाल्यामुळे आंबेडकरी समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटना हेतुपुरस्सर जातीय द्वेषातून घडवून आणल्याचा आरोप कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना तातडीने जेरबंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास जिंतूर तालुक्यातील सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व नेत्यांच्या वतीने १२ मे रोजी एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या प्रकरणाकडे जिल्हा प्रशासन व पोलीस विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.आंदोलनाचा इशारा दिला उपस्थित भंन्ते महानंद,शरद चव्हाण,अक्षय सुर्यवंशी, बळीराम उबाळे, सतीश वाकळे, शंकर वाघ, राहुल शिंदे , अशोक सुरवशे,राजु तुपसुंदर,आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जुगार अडयावर पोलिसांचा छापा

**मानवत,/प्रतिनिधी-** शहरातील आठवडी बाजार परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर मानवत पोलिसांनी छापा टाकून एका आरोपीला रंगेहात पकडले. या कारवाईत रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले असून संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ४ मे रोजी सायंकाळी गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आठवडी बाजार परिसरात छापा टाकला. या ठिकाणी अशोक भगवान आवचार (वय ३०, रा. पंचशीलनगर, मानवत) हा पैशावर ''तितली पत्ता'' नावाचा जुगार खेळ चालवत असल्याचे आढळून आले.

छाप्यादरम्यान काही जण पळून गेले, मात्र मुख्य आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत त्याच्याकडून ४९० रुपयांची रोख रक्कम तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले.

या प्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## गतिरोधक बसविण्याच्या मागणीसाठी सेलूत नागरिकांचा ठिय्या : आठ दिवसांत उपाययोजना करण्याचे प्रशासनाचे लेखी आश्वासन; आंदोलन स्थगित

**सेलू,/प्रतिनिधी:** परतूर-मानवत राज्य महामार्गावरील सेलू शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांच्या अतिवेगामुळे वाढलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी सेलू येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग येथे एक तास 'ठिय्या' आंदोलन केले. अखेर आठ दिवसांत गतिरोधक बसवण्याचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

सेलू शहरातील सातोना रोड ते परभणी रोड हा मार्ग अत्यंत वर्दळीचा असून, या मार्गावर शाळा, महाविद्यालये, हॉटेल्स तसेच दाट नागरी वस्ती आहे. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते वालूर नाका या दरम्यान दोन्ही बाजूंनी सिमेंट रस्ते झाल्याने वाहनचालक भरधाव वेगाने वाहने चालवत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या बेदरकार वेगामुळे अनेक अपघात घडले असून, काही निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, तर काहीजण कायमस्वरूपी अपंग झाले आहेत.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे यापूर्वी अनेक वेळा लेखी निवेदने देऊन तसेच तोंडी पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. प्रशासनाच्या या उदासीनतेच्या निषेधार्थ नागरिकांनी थेट सार्वजनिक बांधकाम कार्यालय गाठून ठिय्या आंदोलन केले. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन अभियंता माने यांनी आंदोलकांशी चर्चा केली. परिस्थितीचे गांभीर्य मान्य करत, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते वालूर रोड दरम्यान आवश्यक त्या ठिकाणी आठ दिवसांच्या आत गतिरोधक बसवण्यात येतील, असे लेखी आश्वासन त्यांनी दिले. या आश्वासनानंतर नागरिकांनी आंदोलन स्थगित केले.

या आंदोलनात जयसिंग शेळके, शिवशंकर मोरे, संतोष निर्वळ, गोविंद हरणे, भरत शेरे, पवन नाईक, समाधान निर्वळ, नितीन होगे, वैभव शेरे, राजू नाईक, मुंजा गाडेकर, गणेश शेवाळे, अक्षय जोशी, विराट तिर्थे, माऊली लेवडे यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक सहभागी झाले होते.

## पिकविम्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे-आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन; शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाईची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान होऊनही पीकविमा कंपनीकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नाकारण्यात आल्याच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बुधवारी (दि. ६) जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २०२५ च्या खरीप हंगामात परभणी जिल्ह्यात अनेकवेळा अतिवृष्टी झाल्याने सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी (एआयसी) कडे विमा हप्ता भरून लाखोंच्या संख्येने पीकविमा संरक्षण घेतले होते. याबाबत राज्य शासनाने ३ ऑक्टोबर, ९ ऑक्टोबर आणि १४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्देश जारी केले होते. त्यानुसार सोयाबीन पिकाचा ड्रायएज रेशो पद्धतीत समावेश करून ग्रीन वेट व ड्राय वेट या निकषांवर नुकसानाचा अंदाज घेण्यात येत होता. मात्र, परभणी जिल्ह्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विमा कंपनीने तांत्रिक कारणे पुढे करत शेतकऱ्यांना पीकविम्यापासून वंचित ठेवल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. जिल्ह्यातील एकूण १८ महसूल मंडळे या योजनेतून वगळण्यात आली असून, परभणी तालुक्यातील नऊपैकी आठ महसूल मंडळांतील शेतकरी अतिवृष्टी होऊनही नुकसान भरपाईपासून वंचित राहिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या आणि पीकविमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे बंधनकारक असतानाही विमा कंपनीने शेतकरीविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात राज्य शासनाकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे आंदोलकांनी सांगितले. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तात्काळ पीकविमा रक्कम वितरित करण्याबाबत संबंधितांना निर्देश देऊन प्रकरण मार्गी लावावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला.

या धरणे आंदोलनात आमदार डॉ. पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जिल्हाभरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## चरित्र्याच्या संशयावरुन पतीने केला पत्नीचा खून : चारठाणा येथील घटना; आरोपीने स्वतः पोलिसांत हजर होऊन कबुली दिली

**जिंतूर,/प्रतिनिधी :** पत्नीच्या चरित्र्यावर संशय घेत पतीने तिच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची धक्कादायक घटना चारठाणा येथे बुधवारी (दि. ६) सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या दरम्यान घडली.

सुमित्रा श्रीधर गायकवाड (वय ४२, रा. चारठाणा ता. जिंतूर) असे मयत महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास तिचा पती श्रीधर गायकवाड याने पत्नीला घरातून दुचाकीवर बसवून जिंतूर-छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत असलेल्या शेत गट क्रमांक ८ मधील आखाड्यावरील निवाऱ्यावर नेले. तेथे पोहोचल्यानंतर आरोपीने प्रथम फावड्याच्या दांड्याने मारहाण केली आणि त्यानंतर डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. या हल्ल्यात महिलेचा जागीच मृत्यू झाला.घटनेनंतर आरोपीने स्वतः चारठाणा पोलिस ठाण्यात हजर होत गुन्ह्याची कबुली दिली. सहाय्यक पोलिस निरीक्षक मुंजाजी दळवे, बीट जमादार उध्दव माने, उध्दव सातपुते तसेच गुप्तचर विभागाचे उमेश बारहाते यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. दरम्यान, मृतदेह शवविच्छेदनासाठी जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी चारठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मुंजाजी दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक बप्पासाहेब झिंर्जुडे करीत आहेत.

## ग्रामीण रुग्णालयात उपसंचालक डॉ. कांचन वानरे यांची सरप्राईज भेट आरोग्य सेवांचा घेतला आढावा

**मानवत ,/प्रतिनिधी:** येथील ग्रामीण रुग्णालयात गुरुवार, दि. ४ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. कांचन वानरे यांनी अचानक भेट देत रुग्णालयातील विविध आरोग्य सेवांची सखोल पाहणी केली.

डॉ. वानरे यांनी बाह्यरुग्ण विभागातील सेवा-सुविधांची तपासणी केली. तसेच आंतररुग्ण विभाग, प्रसूतीगृह आदी विभागांची पाहणी करून रुग्णांशी थेट संवाद साधला. लसीकरण विभागामार्फत ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांचे सर्व प्रकारचे लसीकरण नियमितपणे करण्यात येत असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने त्यांना दिली. प्रयोगशाळा विभागात रक्त, लघवी, मलेरिया, डेंग्यू, क्षयरोग आदी तपासण्या



केल्या जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. तसेच एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रामार्फत मोफत समुपदेशनासह एचआयव्ही व व्हीडीआरएल (गुप्तरोग) तपासण्या केल्या जात असल्याची माहिती देण्यात आली. कुष्ठरोग विभागामार्फतही रुग्णांना आवश्यक सेवा पुरविल्या जात असल्याचे निदर्शनास आले.

याशिवाय, रुग्णालयात नव्याने सुरू करण्यात आलेले ईसीजी व क्ष-किरण (एक्स-रे) विभाग, तसेच अत्याधुनिक ऑक्सिजन प्लांटचीही त्यांनी पाहणी केली. लवकरच नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन ती रुग्णसेवेत दाखल होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. वैद्यकीय अधीक्षक डॉ. आशेक शेख यांच्या उपस्थितीत डॉ. वानरे यांनी सर्व विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. तपासणीत आढळलेल्या काही त्रुटी दूर करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

तसेच शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'ई-सुश्रुत' ऑनलाइन सेवांचे चार पोर्टल प्रभावीपणे सुरू असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान रुग्ण कल्याण समिती सदस्य संजय नाईक, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. प्रफुल्ल जाधव, डॉ. अनुराधा गोरे, औषध निर्माण अधिकारी शीतल गायकवाड, मीनाक्षी कदम, प्रभारी अधिपरिचारिका शुभांगी जोशी, योगिता मेहत्रे, बालिका सुरवसे, करुणा ढेपे, रेखा फुलमोगरे, राजू कच्छवे, नितीन शिंदे, कपिल भरड, शुभम करवलकर, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे डॉ. गजदत्त चव्हाण, डॉ. ललित कोकरे, डॉ. सुषमा भदर्गे, सुनील खरात, सचिन कदम, कार्यालयीन अधीक्षक वायभसे, संजय सोळंके, संजय मानवतकर, वाहेद सय्यद, ज्ञानेश्वर माकुडे, आरोग्य सेवक अकबर पठाण, अधिकारी रत्नमाला दाभाडे, रेणुका गिराम, राजू पिंपळे, गणेश गरड, दीपक कुमावत यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.